बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकः बाळासाहेब मस्के

बीड | शनिवार, दि.५ ऑक्टोबर २०२४ | वर्षे ४रे | अंक ६४वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## ‘त्या’ वादग्रस्त नकाशावरून

दिल्ली:इस्त्रायलने त्यांच्या अधिकृत संकेतस्थळावरील भारताचा एक नकाशा हटवला आहे. या नकाशात जम्मू काश्मीर राज्याचा बराचसा भाग पाकिस्तामध्ये असल्याचं दर्शवण्यात आलं होतं. हा नकाशा पाहून भारतीय नागरिकांनी समाजमाध्यमांवर नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर इस्त्रायलचे भारतातील राजदूत रुवेन अजार यांनी यावर प्रतिक्रिया देखील दिली होती. रुवेन म्हणाले होते की, संकेस्थळाच्या संपादकाच्या चुकीमुळे तो नकाशा संकेतस्थळावर दिसत होता. आम्ही तो नकाशा संकेतस्थळावरून लगेच हटवला आहे. एका भारतीय युजरने एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर या नकाशाचा फोटो (वेबसाइट पेजचा स्क्रीनशॉट) शेअर केला होता. त्यानंतर इतर नागरिकांनी देखील हा मुद्दा उचलून धरल्यानंतर ही गोष्ट इस्त्रायलच्या भारतातील राजदूतांपर्यंत आणि त्या संकेतस्थळाच्या संपादकापर्यंत पोहोचली. त्यानंतर त्यांनी तो वादग्रस्त नकाशा संकेतस्थळावरून हटवला आहे.

# मुख्यमंत्री अन् मंत्रिमंडळाची स्वित्झर्लंड दौऱ्यात १.५८ कोटींची उधारी



राहण्या-खाण्याचे बिल बाकी असल्याचे समोर आले | सरकारने गरजेपेक्षा अधिक खर्च केला | रोहित पवारांची राज्य सरकारवर टीका

## कंपनीनं पाठवली कायदेशीर नोटीस

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्यात गुंतवणूक आणण्यासाठी मुख्यमंत्री, मंत्रिमंडळातील मंत्री आणि काही अधिकाऱ्यांनी जानेवारी महिन्यात स्वित्झर्लंडमधील दावोस येथे जागतिक आर्थिक परिषदेला हजेरी लावली होती. या दौऱ्यात मुख्यमंत्री आणि मंत्र्यांच्या राहण्या-खाण्याचे बिल बाकी असल्याचे आता समोर आले आहे. स्वित्झर्लंडमधील कंपनीने १.५८ कोटींची उधारी चुकविण्यासाठी आता राज्य सरकारच्या विभागाला कायदेशीर नोटीस पाठविल्याची माहिती मिळत आहे. द इंडियन एक्सप्रेसने या संदर्भातली बातमी दिली आहे. तसेच रोहित पवार यांनी कथित नोटीशीचा काही भाग एक्सवर पोस्ट केला असून राज्य सरकारवर खोचक टीका केली आहे.महाराष्ट्राच्या औद्योगिक विकास महामंडळाला (चखऊउ) २८ ऑगस्ट रोजी ही नोटीस मिळाली असल्याचे कळते. तसेच मुख्यमंत्री कार्यालय, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर आणि जागतिक आर्थिक परिषद यांनाही याबाबत सूचित करण्यात आले आहे. कंत्राटदार ड्ढ--कत्र्ख़लकयांनी आरोप केला की, राज्याच्या अंतर्गत येणाऱ्या औद्योगिक विकास महामंडळाने त्यांचे १.५८ कोटींचे बिल भरलेले नाही. जागतिक आर्थिक परिषदेतच सदर बिल एमआयडीसीकडे सुपूर्द करण्यात आले होते. नोटीशीनुसार, एमआयडीसीने आतापर्यंत ३.७५ कोटींची बिल भरले आहे. मात्र उरलेले १.५८ कोटी रुपये दिलेले नाहीत.द इंडियन एक्सप्रेसने एमआयडीसीचे सीईओ पी वेलरासू यांना संपर्क साधून त्यांची बाजू जाणून घेतली. यावेळी ते म्हणाले, अशी नोटीस मिळाल्याची त्यांना कल्पना नाही. तथापि, एमआयडीसी या प्रकरणात लक्ष घालून योग्य ती कार्यवाही करेल. तसेच या प्रकरणाचा तपास करून लवकरात लवकर निर्णय घेतला जाईल.दरम्यान विरोधी पक्षातील शिवसेना (ठाकरे) पक्षाचे नेते आदित्य ठाकरे आणि राष्ट्रवादी

पान २ वर...

### रोहित पवारांनी काय आरोप केला?

दावोसमध्ये जाऊन महाराष्ट्र सरकार खाऊन पिऊन आले. पण बिल उधार ठेवून आले. आता उधारी देत नाहीत म्हणून तिथल्या कंपनीने राज्य सरकारला नोटीस पाठवली आहे. महाराष्ट्र सरकारच्या अशा दळभद्रीपणामुळे आंतराष्ट्रीय गुंतवणुकीच्या दृष्टीने महत्वपूर्ण असणाऱ्या दावोस परिषदेसारख्या मंचावर महाराष्ट्राची बदनामी होऊ शकते, गुंतवणूकदारांमध्ये चुकीचा संदेश जाऊ शकतो. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उद्योग मंत्री उदय सामंत यांनी संबंधित यंत्रणेला सदरील विषय निकाली काढण्याचे आदेश द्यावेत, ही विनंती, अशी मागणी रोहित पवार यांनी केली.

## बीडमध्ये रिपाइंचे निळे वादळ धडकणार

### पप्पु कागदे : बीडमध्ये मंत्री आठवलेंच्या सत्काराची जय्यत तयारी

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा भारत सरकारचे केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची केंद्रीय मंत्री मंडळात तिसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल बीड जिल्हा रिपाइंच्या वतीने आज शनिवार (दि.५) ऑक्टोबर रोजी बीड शहरात छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे दुपारी ३:३० वाजता, केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा भव्य सत्कार सोहळा युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइं बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली सपन्न होतो आहे. या ऐतिहासिक भव्य सत्कार सोहळ्यात निळे वादळ उसळणार आहे.

मंत्री रामदास आठवले यांची केंद्रीय मंत्रिमंडळात सलग तिसऱ्यांदा सामाजिक न्याय मंत्री म्हणून निवड झाली आहे.या निवडीचा युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे यांच्याकडून ऐतिहासिक सत्कार सोहळा आयोजित केला आहे. या सत्कार सोहळ्याची अतिशय जय्यत तयारी बीड शहरात करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने होल्डिंग, कमानी, बॅनर, निळ्या पट्टया व निळ्या ध्वजाचा झंझावात निर्माण करुन निळ्या वादळाचे शक्तिप्रदर्शन रिपाइंच्या वतीने करण्यात आले आहे. दरम्यान मंत्री रामदास आठवले यांचा हा सत्कार सोहळा ऐतिहासिक

पान २ वर...







## आ.लक्ष्मण आण्णांच्या प्रयत्नातून कोट्यावधीचा निधी

### शिवराज पवार: ५० कोटी रुपयांच्या रस्ता कामाचे उदघाटन



गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

मतदारसंघातील रस्ते,जलसिंचन,आगनवाडी, दवाखाना,शाळेच्या इमारती अशा विविध विकास कामे करण्यासाठी आ.लक्ष्मण आण्णा पवार यानी सरकार दरबारी पाठपुरावा करून मतदारसंघातील सर्वांगिण विकासासाठी कोट्यावधीचा निधी आणून मतदारसंघाचे चित्र बदलत आसल्याचे शिवराज बाळराजे पवार यानी गावातील विकास कामाच्या शुभारंभ प्रसंगी बोलताना म्हटले

आज दि. ४ ऑक्टोबर रोजी मन्यारवाडी,धोडराई, बेलगाव,भोजगाव, आदि गावच्या रस्ता कामांचा शुभारंभ युवानेते शिवराज पवार यांच्या हास्ते करण्यात आला

यावेळी सरपंच बाबासाहेब पवार, उपसरपंच हरीभाऊ निकम,सुदाम बप्पु डिंगरे, नारायण जगताप, संतोष सोनमाळी, केशव साळुंके, परमेश्वर पवार, संजय जाधव पंचायत समिती सदस्य, नंदू शेठ गरड सरपंच, अशोक खिसाडे,दत्ता गवळी,बाबासाहेब डिंगरे, आसाराम डिंगरे, लक्ष्मण घाडगे,राम नाना डिंगरे,

पान २ वर...

मतदारसंघातील दैठण ते कटचिचोली, रा.मा .५० ते टाकळगव्हान,चोपड्याची वाडी, गोपत पिंपळगाव ते काठोडा तांडा, काठोडा तांडा ते जातेगाव, रा.मा ६२ ते चोरपुरी रस्ता कामांच आज शनिवार रोजी शुभारंभ होणार आहे



## जातीचा तुरुंग आणि तुरुंगातील जात!

देशात जात हा एक सर्वात मोठा तुरुंग आहे हे अमान्य करणे 'सारे कसे छान छान' हे गीत बसता-उठता आळवणाऱ्यांनाही अवघड. 'आम्ही कसे जात-पात पाळत नाही' असे मिरवणारेही त्यांच्या 'अ-जात'शत्रुत्वाची उदाहरणे देऊ लागले की त्यामागील जातीचे वास्तव उघडे पडते. हे सारे अमान्यच करावयाचे असेल त्यांची गोष्ट वेगळी. पण इतरांस या जातवास्तवाची दखल घ्यावी लागते. ते घेतात. त्यामुळे या वर्गांस आपल्या प्रत्येक निर्णयामागील जातीचा कोन स्पष्टपणे जाणवतो आणि तो ते मान्य करतात. आपल्या सांस्कृतिक प्रतिक्रियाही उमटतात त्या पूर्वायुष्यात मिळालेल्या संस्कारांतून जे जात या संकल्पनेवरच आधारित असतात. हे जात-वास्तव इतक्या प्रकर्षाने नमूद करण्याचे कारण म्हणजे सर्वोच्च न्यायालयाने दिलेला ऐतिहासिक निर्णय. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्या. मनोज मिश्रा आणि न्या. जे. बी. पारडीवाला यांच्या पीठाने गुरुवारी देशातील बहुतेक राज्यांच्या तुरुंग नियमावल्या बरखास्त केल्या आणि कैद्यास तुरुंगात दाखल करून घेताना त्याच्या जातीची नोंद केली जाऊ नये, असा अत्यंत महत्त्वपूर्ण आदेश दिला. हा महत्त्वपूर्ण अशासाठी की प्रत्येक कैद्याच्या जातीची नोंद केल्याने त्यास तुरुंगात दिली जाणारी कामे ही त्याच्या 'जातीप्रमाणे' असतात, म्हणून. म्हणजे एखादा कैदी कितीही नराधम गुन्ह्यासाठी शिक्षा भोगत असेल आणि जर तो उच्चवर्णीय असेल तर त्यास स्वच्छतागृह सफाईची कामे दिली जात नाहीत आणि या उलट एखादा कथित कनिष्ठवर्णीय कितीही किरकोळ गुन्ह्यासाठी कैदी असेल तर त्यास स्वयंपाकाचे काम दिले जात नाही, त्याने स्वच्छताच करावयाची! याचा अर्थ भारतीय तुरुंग हे एकप्रकारे जातीप्रथेचे कट्टर पाईक आहेत असे दिसते. म्हणून सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निर्णयाचे महत्त्व. हे कसे झाले हे लक्षात घ्यायला हवे.

'एखादे काम हलके आहे असे समजणे हेच जात व्यवस्थेचे निदर्शक', हे राज्यांच्या तुरुंगनियमावलीबद्दल सर्वोच्च न्यायालयाच्या निकालातील विधान तर बोधवाक्य ठरावे

देशात जात हा एक सर्वात मोठा तुरुंग आहे हे अमान्य करणे 'सारे कसे छान छान' हे गीत बसता-उठता आळवणाऱ्यांनाही अवघड. 'आम्ही कसे जात-पात पाळत नाही' असे मिरवणारेही त्यांच्या 'अ-जात'शत्रुत्वाची उदाहरणे देऊ लागले की त्यामागील जातीचे वास्तव उघडे पडते. हे सारे अमान्यच करावयाचे असेल त्यांची गोष्ट वेगळी. पण इतरांस या जातवास्तवाची दखल घ्यावी लागते. ते घेतात. त्यामुळे या वर्गांस आपल्या प्रत्येक निर्णयामागील जातीचा कोन स्पष्टपणे जाणवतो आणि तो ते मान्य करतात. आपल्या सांस्कृतिक प्रतिक्रियाही उमटतात त्या पूर्वायुष्यात मिळालेल्या संस्कारांतून जे जात या संकल्पनेवरच आधारित असतात. हे जात-वास्तव इतक्या प्रकर्षाने नमूद करण्याचे कारण म्हणजे सर्वोच्च न्यायालयाने दिलेला ऐतिहासिक निर्णय. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्या. मनोज मिश्रा आणि न्या. जे. बी. पारडीवाला यांच्या पीठाने गुरुवारी देशातील बहुतेक राज्यांच्या तुरुंग नियमावल्या बरखास्त केल्या आणि कैद्यास तुरुंगात दाखल करून घेताना त्याच्या जातीची नोंद केली जाऊ नये, असा अत्यंत महत्त्वपूर्ण आदेश दिला. हा महत्त्वपूर्ण अशासाठी की प्रत्येक कैद्याच्या जातीची नोंद केल्याने त्यास तुरुंगात दिली जाणारी कामे ही त्याच्या 'जातीप्रमाणे' असतात, म्हणून. म्हणजे एखादा कैदी कितीही नराधम गुन्ह्यासाठी शिक्षा भोगत असेल आणि जर तो उच्चवर्णीय असेल तर त्यास स्वच्छतागृह सफाईची कामे दिली जात नाहीत आणि या उलट एखादा कथित कनिष्ठवर्णीय कितीही किरकोळ गुन्ह्यासाठी कैदी असेल तर त्यास स्वयंपाकाचे काम दिले जात नाही, त्याने स्वच्छताच करावयाची! याचा अर्थ भारतीय तुरुंग हे एकप्रकारे जातीप्रथेचे कट्टर पाईक आहेत असे दिसते. म्हणून सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निर्णयाचे महत्त्व. हे कसे झाले हे लक्षात घ्यायला हवे.



# विद्यार्थी प्रिय सगळगिळे गुरुजी

शिक्षण क्षेत्रात आता शिक्षकाला सर म्हणण्याचा जमाना आला. एकेकाळी प्राथमिक शिक्षकाला गुरुजी असे म्हणत होते. हे गुरुजी म्हणजे खरेखुरे गुरु होते. खेड्यापाड्यात, वाड्या वस्तीत, शहरात, महानगरात मूलभूत मार्गदर्शन करत होते.

त्याकाळात सगळगिळे गुरुजी राहुरी नगरपालिकेच्या पहिल्या बॅच चे शिक्षक होते. ते उपेक्षित असलेल्या राहुरी स्टेशन शा.क्र.५ वर शिक्षक म्हणून रुजू झाले. त्यांनी नगरपालिकेत सर्वप्रथम सैनिक स्कूलला विद्यार्थी पाठविण्यात यशस्वी झाले. त्यावेळी अवघी चौथी इयत्तेपर्यंत शाळा होती.ही शाळा तत्कालीन प्रशासनाधिकारी अजय रामटेके साहेब यांच्या सहकार्याने सातवी इयत्तेपर्यंत शाळा नेली. मुली सहजपणे दहावी पर्यंत शिकू लागल्या. सगळगिळे गुरुजी अंकगणित शिकविण्यासाठी प्रविण होते. शिक्षक संघटनेत ते कुशल संघटक होते.शिक्षकांच्या प्राथमिक शिक्षक विकास मंडळ, अहमदनगरचे ते पाच वर्षे निर्वाचित विश्वस्त होते. तसेच बहुजन विकास मंडळाचे ते संस्थापक सदस्य होते संस्थापक सदस्य होते. राहुरी मध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला आयोजित करण्यात त्यांचा मोठा सहभाग असे. ते एव्हरग्रीन शिक्षक होते. आवडलेल्या विनोदावरील त्यांचे मनमोकळे गडगडाटी हास्य कोणीही विसरू शकणार नाही. ते शरीराने अनंतात विलीन झाले. या घटनेला एक वर्ष संपले. त्यांचा बौद्ध संस्कार पद्धतीने ५ ऑक्टोबर २०२४ ला राहुरी येथे स्मृतिदिन संपन्न होत आहे. त्यानिमित्त त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

शब्दांकन
सत्येंद्र तेलतुंबडे,राहुरी

# ...आम्ही रोज जनतेच्या दरबारात!

## डॉ.सारिकाताई क्षीरसागरः पिंपळवाडीत आरोग्य शिबिर

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर सक्रिय न होता, आम्ही दररोज चोवीस तास बीडकरांच्या सेवेत आहोत. निवडणुकीच्या तोंडावर दिशाभूल करणारे कार्यक्रम घेण्याऐवजी आरोग्य सेवा देणे माझ्यासह डॉ.योगेश यांना योग्य वाटले. ऐन निवडणुकीच्या तोंडावर इतरांप्रमाणे सक्रीय न होता आम्ही रोज जनतेच्या दरबारात जातो, त्यामुळे बीडची जनता आम्हालाच आशिर्वाद देईल, असा विश्वास कल्पतरूच्या सचिव डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी व्यक्त केला.

बीड तालुक्यातील पिंपळवाडी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने मोफत आरोग्य शिबिर शुक्रवारी (दि.४) पार पडले. यावेळी उद्घाटक म्हणून डॉ. सारिकाताई क्षीरसागर ह्या बोलत होत्या. व्यासपीठावर ह.भ.प.भक्तीदास महाराज शिंदे, ह.भ.प. तुकाराम महाराज भारती, माजी आमदार जनार्धन तुपे, माजी नगरसेवक गणेश वाघमारे, पिंपळवाडीच्या उपसरपंच पूजाताई बहिरवाळ, बेलखंडीचे सरपंच गुंडीबा देवडे, राष्ट्रवादी काँग्रेस डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ.रमेश शिंदे, करचुंडीचे माजी सरपंच भालचंद्र भंडाणे, भाळवणीचे माजी सरपंच सचिन बहिरवाळ, शिवाजी येडे, मुळूकचे सरपंच रामकिसन कदम, वरवटीचे सरपंच बाळासाहेब इंगोले यांच्यासह पदाधिकार्यांची उपस्थिती होती.पुढे बोलताना डॉ.सारिकाताई क्षीरसागर म्हणाल्या, रूग्णसेवा हा राजकारणाचा भाग कधीच असू शकत नाही. माझ्यासह डॉ.योगेश हे वैद्यकीय क्षेत्र आणि राजकारणात सक्रीय आहेत. आमची आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून सुरु असलेली आरोग्य सेवा राजकारणापलिकडे जाऊन सुरुच राहणार आहे. आम्ही निवडणुकीच्या तोंडावर दिशाभूल करण्याऐवजी शाश्वत विकास कार्यक्रमांवर भर देत राहू. हाच प्रयत्न आगामी काळातही राहील, असे त्या म्हणाल्या. यावेळी श्रीरंग खटाणे, सीताराम बहिरवाळ, रवि काळे, बाळासाहेब थोरात, वैभव तुपे, तुकाराम वाघुले, भास्कर कदम, सुंदर कांगरे, राम जाधव, विनोद बहिरवाळ, भारत डोंगर, बाबुराव वाघुले, अंकुश वाघुले, रामहरी वाळेकर, महेश वनवे, बापू येळवे, बाबा मस्के, बाळासाहेब जटाळ, महेश मातकर, शहादेव खोसे, अशोक वेदपाठक यांच्यासह रूग्ण, ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



### डॉ.योगेश क्षीरसागरांनी केली रुग्णांची तपासणी

पिंपळवाडीतील आरोग्य शिबिरास भेट देत राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी रुग्णांसह नागरिकांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी स्वतः काही रूग्णांची तपासणी केली. विधानसभा मतदारसंघातील पिंपळवाडीचे हे आठवे आरोग्य शिबिर असून अनेकांच्या शस्त्रक्रिया मोफत करून देण्यात आल्या आहेत.

# बीडमध्ये होम मिनिस्टर स्पर्धा

## अनिल जगताप:फ्रिज, टीव्ही, शिलाई मशीनसह पैठणी साडी



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीडच्या संस्कृतीक, क्रीडा, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात आपले सर्वोपरी योगदान देणाऱ्या शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या संकल्पना मार्गदर्शनाखाली बीड शहरातील महिला-भगिनींच्या अंगी असलेल्या कलागुणांना दर्जेदार व्यासपीठ मिळावे या उदात्त हेतूने आज दि. ५ ऑक्टोबर २०२४ रोजी सायं ६.०० वाजता रामकृष्ण लॉन्स बीड येथे अमोल जाधव यांच्या वतीने भव्य दिव्य होम मिनिस्टर खेळ पैठणीचा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी अवघ्या महाराष्ट्रातील महिलांचे लाडके भाऊजी किरण पाटील उपस्थित राहणार आहेत. या स्पर्धेमध्ये विजेत्या महिलांसाठी विविध खेळांचे आयोजन करण्यात आले असून विजेत्या महिलांना आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. प्रथम क्रमांक प्राप्त विजेत्या महिलेस फ्रिज, द्वितीय क्रमांक प्राप्त दोन महिलांना प्रत्येकी १ एलसीडी टीव्ही असे दोन एलसीडी टीव्ही, तृतीय क्रमांक प्राप्त विजेत्या तीन महिलांना प्रत्येकी १ शिलाई मशीन अशा तीन शिलाई मशीन व त्यानंतर पुढील २१ विजेत्या महिलांना प्रत्येक १ पैठणी अशा २१ पैठणी साडी बक्षीस स्वरूपात देण्यात येणार आहेत. याबरोबरच होम मिनिस्टर स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक महिलेला संसार उपयोगी आकर्षक भेटवस्तू देण्यात येणार असल्याचे संयोजकांच्या वतीने सांगण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन स्वतः महाराष्ट्रातील महिलांचे लाडके भाऊजी किरण पाटील करणार आहेत. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी बीडमधील महिला-भगिनींनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक येथील शिवसेना मध्यवर्ती कार्यालय जालना रोड बीड येथे येऊन आपल्या नाव नोंदणी करावी .

### महिलांनी सहभागी व्हावे

बीडमधील महिला-भगिनींच्या अंगी सुप्त अवस्थेत दडलेल्या कलागुणांना वाव मिळावा याकरिता माझे सहकारी अमोल जाधव यांच्या माध्यमातून होममिनिस्टर खेळ पैठणीचा या कार्यक्रमाचे दि. ५ ऑक्टोबर रोजी रामकृष्ण लॉन्स बीड येथे सायं ६.०० वाजता भव्य स्वरूपात आयोजन करण्यात आले आहे. फ्रिज, एलसीडी टीव्ही, शिलाई मशीन, पैठणी साडी तसेच संसार उपयोगी असणाऱ्या भेटवस्तू देखील सहभागी महिलां-भगिनींना देण्यात येणार आहे. अवघ्या महाराष्ट्रातील महिलांचे लाडके भाऊजी किरण पाटील हे स्वतः उपस्थित राहणार असून पूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचलन ते स्वतः करणार आहेत. रोजच्या दैनंदिन व्यापातून स्वतःसाठी थोडासा वेळ काढून बीड शहरातील महिलांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# ऊबाटा गटाची सोपविली धुरा!

## राज्य शिक्षक सेनेच्या अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्षपदी अफरोज पटेल

औरंगाबाद/पुण्यभूमी प्रतिनिधी

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार व आमदार ज मो अभ्यंकर यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती संभाजीनगरसह बीड, धाराशिव, हिंगोली आदी जिल्हयातील कार्यकारिणीमध्ये काही प्रमाणात संघटनात्मक फेरबदल करून काही नूतन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या मुंबईत घोषित करण्यात आल्या. यामध्ये महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेच्या संभाजीनगर अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्षपदी अफरोज लतीफ पटेल यांची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेचे प्रांताध्यक्ष व मुंबई विभाग शिक्षक आमदार ज. मो.अभ्यंकर यांच्या हस्ते मुंबई येथे अफरोज लतीफ पटेल यांना नियुक्ती पत्र देण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना सरचिटणीस प्रकाश शेळके, राज्य कोषाध्यक्ष ड.सुधाकर कापरे, मुंबई विभाग अध्यक्ष अजित चव्हाण, प्रादेशिक सचिव मुकेश शिरसाठ, कायदेशीर सल्लागार मच्छिंद्र खरात, मराठवाडा अध्यक्ष नामदेवराव सोनवणे, मराठवाडा उपाध्यक्ष लक्ष्मण पाईकराव, जिल्हाध्यक्ष विलास पाटील, संपर्कप्रमुख दत्ताभाऊ पवार, जिल्हाध्यक्ष कैलास हराळ, जिल्हा कार्याध्यक्ष गवळी सर, जिल्हा उपाध्यक्ष इंगळे, प्रसिद्धीप्रमुख भाऊसाहेब घाडगे, सुनिल डुकरे, गोविंद मुळे, संजय जाधव, विलास मोरे, सुरेश यादव, योगेश पाटील, दिलीप ओसावी, सुनील काळे, जगदीश पष्टे त्याचबरोबर शिक्षक सेनेचे बरेच पदाधिकारी उपस्थित होते.



## पान एक वरून

**मुख्यमंत्री अन् मंत्रिमंडळाची**

(शरद पवार) पक्षाचे नेते रोहित पवार यांनी मात्र सरकारवर जोरदार टीका केली. दावोस येथे सरकारने गरजेपेक्षा अधिक खर्च केला असल्याचा आरोप दोन्ही नेत्यांनी केला.राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी मात्र सदर नोटीस मिळाली असल्याचे मान्य केले. ते म्हणाले, आम्ही अधिकचा खर्च केलेला नाही. महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून तसा आरोप केला जात आहे. आमचा विधी विभाग या नोटीशीला उत्तर देईल.

**आ.लक्ष्मण आण्णांच्या प्रयत्नातून**

गिरजा आप्पा मराठे, अॅड.राजेंद्र साळुंके, रमेश पोटे,मदन डिंगरे, हरीभाऊ डिंगरे,पिंटू फरताडे, राजेंद्र फरताडे, कैलास कदम, भिमराव पवार, रघुनाथ सोनमाळी, भगवान सोनमाळी, शिवाजी जगताप राहुल बर्गे रखमाजी डिंगरे, विष्णू टिंगरे, बाबू टकले, वैजनाथ सोनमळी, सयाजी जगताप, जालिंदर यादव, लहू घाडगे, शिवाजी घाडगे, गणेश महाराज नावडे, लक्ष्मण घाडगे, जनार्दन शिंदे भीमराव घाडगे भानुदास चव्हाण बंडू घाडगे सुदाम घाडगे मदन घाडगे परभू मामा टकले रघुनाथ डिंगरे मदन नाना डिंगरे आसाराम पवार ज्ञानेश्वर खरवडे बाबुराव घाडगे भीमराव फरताडे भाऊसाहेब गायकवाड अविनाश पोटे, गणेश आखरे, नितेश निकम मदन निकम महेश घाडगे अभिमान घाडगे प्रकाश घाडगे महादेव पोटे बाबासाहेब जगताप विकास टकले रवींद्र जगताप परमेश्वर घाडगे विष्णू घाडगे गावातील नागरिक उपस्थित होते.

**बीडमध्ये रिपाइंचे निळे**

ठरणार असून त्यासाठी जिल्हाभरातून रिपाइं कार्यकर्ते हजारो गाड्यांचा ताफा घेऊन दाखल होणार आहेत.बीड शहरात रिपाइंच्या वतीने होणाऱ्या मंत्री रामदास आठवले यांच्या भव्य रॅलीत व सत्कार सोहळ्यात हजारोच्या संख्येने सामील होऊन, निळ्या वादळाचे शक्ती प्रदर्शन करावे.असे आवाहन भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजक युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी केले आहे.

## पान सहा वरून

**अनेक भावी सेटलमेंटच्या**

पैशासाठी राजकारण केलेलं आहे अशी चर्चा सध्या मतदारसंघात आयकाला मिळत आहे. जितके उमेदवार जास्त असतील तेवढी रंगत या निवडणुकीमध्ये पाहायला मिळेल परंतु मागील पार्श्वभूमी पाहता अनेक जण वेगळ्याच हेतूने सध्या प्रचार आणि प्रसार करत आहेत. परिवर्तन होत असतं परंतु त्या परिवर्तनासाठी सर्वसामान्य असा उमेदवार लोकांच्या विश्वास पात्र ठरला पाहिजे. यापूर्वी अनेक राजकीय नेत्यांनी एका पक्षातून निवडून येऊन, पैसे घेतल्यानंतर दुसऱ्या पक्षात च्या उमेदवाराला पाठिंबा दिला आहे. निवडणुकीच्या तोंडावर बलाढ्य पैसेवाल्या उमेदवारांनी पैसे दिले तर माघार घेऊ नका व आमदार कोणी पण हो पण समाजाची सेवा मात्र विसरू नका ही चर्चा मतदारसंघात आहे.

**जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये गुरुकुल**

नबील, संविधान सावते,रणवीर राठोड, दिप काळे, शशांक सारंगकर, दुर्गेश झांबरे, आर्यन कुटे, कैवल्य मोहिते, गौरव शिंदे, सहर्ष धाडे वरील खेळाडू १४ वर्षाखालील शालेय क्रिकेटच्या परभणी येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेमध्ये बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतील या विजयी खेळाडूंना क्रीडा प्रशिक्षक कल्याण माने , रामदास गिरी, महेश गव्हाणे यांच्या मुलाचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल गुरुकुल इंग्लिश स्कूलच्या अध्यक्षा डॉ. विनिता ढाकणे, सचिव डॉ.राजेंद्र ढाकणे, कार्यकारी संचालक अखिलेश ढाकणे, प्राचार्य शीतल सर्वज्ञ, उपप्राचार्य अमोल कपूर, सारा मॅम, गणेश इंगोले सर, क्रीडा शिक्षिका वाघमारे मॅडम अन्य प्रशिक्षक व पालकांनी मुलांचे कौतुक केले व पुढील स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

**धम्मदीक्षा जागृती अभियानाचे**

अमृत, किशोर कांबळे आदींनी आयोजन केले आहे. ही रॅली राहुरी, देवळाली प्रवरा, श्रीरामपूर, हरेगाव स्वाभिमान भूमी, छत्रपती संभाजीनगर, जालना, सिंदखेडराजा, धम्मभूमी अकोला, अमरावती, बुद्ध वन काटोल, शांतीवन चिचोली मार्गे दीक्षाभूमी ला जाणार आहे. ठिकठिकाणी धम्मदीक्षा जागृती आणि धम्मदीक्षा दिली जाणार आहे. या अभियानात मोठ्या प्रमाणे सहभागी होण्याचे आवाहन संयोजकांच्या वतीने केले आहे.

**कागदेंना विधानसभेत पाठवण्यासाठी**

ताकद महत्वाची आहे. युवकांनी कोणत्याही आमिषाला बळी न पडता आंबेडकरी विचार पुढे घेऊन जायचा आहे, आपली एकजूट महत्वाची आहे. आपला स्वाभिमान कुठेही गहाण न ठेवता प्रस्थापितांसमोर आपली ताकद दाखवून द्यायची आहे. आपली ताकद दिसली तरच आपले प्रश्न सुटतील, आपल्या समाजातील लोकांसमोर अनेक प्रश्न आहेत. तेव्हा आपली ताकत कायम एक ठेवा, केंद्रीय मंत्री ना. रामदास आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली रिपाईची ताकद वाढवण्यासाठी व समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी माझ्या शेवटच्या श्वासापर्यंत अहोरात्र मेहनत घेत राहील येणाऱ्या ५ तारखेला मोठ्या संख्येने बीड येथे होणाऱ्या सत्कार समारंभास व पपुजी कागदे साहेबांना विधानसभेत पाठवण्यासाठी उपस्थित रहा असे आवाहन भीम दल संघटना प्रमुख तसेच रिपाई युवक जिल्हा उपाध्यक्ष ड.धम्मानंद वाघमारे यांनी केले आहे

**राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी**

सह डॉ. आसाराम मराठे, माजी प्रा.गणपतराव नाटकर, सह शाळेचे प्राचार्य तथा प्रशासकीय अधिकारी प्रमोद गोरकर, अरुण हाटकर यांनी अभिनंदन केले. या खेळाडूंना क्रीडा शिक्षक पवार डि के सरांचे व कदम सरांचे विशेष मार्गदर्शन लाभले.तसेच पठाण जिया दिलावर या विद्यार्थ्याला राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी पुढील शुभेच्छा देण्यात आल्या.

**ऊसतोड कामगार अपघात विमा'**

धनंजय मुंडे यांनी सामाजिक न्याय विभागामार्फत प्रस्तावित केले होते. राज्याचे मुख्यमंत्री व सध्याचे सामाजिक न्याय मंत्री एकनाथराव शिंदे यांनी अर्थ व नियोजन विभागाच्या समन्वयातून या योजनेला मूर्त स्वरूप दिले असून, त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे. ऊसतोड कामगारांना विम्याचे कवच असावे, हे स्व.गोपीनाथराव मुंडे साहेबांचे स्वप्न आज महायुती सरकारच्या माध्यमातून पूर्ण होत आहे आणि त्यात माझाही काही वाटा आहे, याचा मनाला मनापासून आनंद वाटतो आहे, याबाबद्दल मी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे मनापासून आभार मानतो, असे भावनिक उद्गार धनंजय मुंडे यांनी यावर प्रतिक्रिया देताना व्यक्त केले आहेत. पूर्वी केवळ कागदावर राहिलेले ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ उद्योग ऊर्जा व कामगार विभागाकडून सामाजिक न्याय खात्याकडे हस्तांतरित करून घेत धनंजय मुंडे यांनी या महामंडळाला मूर्त स्वरूप दिले. महामंडळाचे कार्यकारी संचालक मंडळ, लेखाशीर्ष निर्माण करून ऊसतोड कामगारांची प्रथमच शासकीय कागदावर 'ऊसतोड कामगार'म्हणून नोंदणी केली. या महामंडळाचा खर्च शासनावर अधिभार होऊ नये म्हणून राज्यात गाळल्या जाणाऱ्या उसावर प्रतिटन १० रुपये कल्याण निधी साखर कारखाना व त्याच्या समप्रमाणात निधी शासनाकडून अशी कायमस्वरूपी व्यवस्था केली. याच महामंडळाच्या माध्यमातून राज्यात संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजना सुरू करून ऊसतोड कामगारांच्या मूला मुलींसाठी ८२ वसतिगृहे सुरू करून ऊसतोड कामगारांच्या हातात वडिलोपार्जित कोयता न देता पाटी-पुस्तक देऊन शिक्षणाचा मार्ग खुला केला आहे. त्यापाठोपाठ आता ऊसतोड कामगारांच्या विम्याचा प्रश्न निकाली निघाल्याने काही प्रमाणात का असेना परंतु कायम विकासापासून वंचित राहिलेल्या या वर्गाला खऱ्या अर्थाने मुख्य प्रवाहात आणण्याचे काम सुरू आहे, असे म्हणता येईल.

**मुंदडा कार्यकर्ता पत्रकारांना**

लोकशाही गणराज्यामध्ये सर्वसमान्य नागरीकांनी जगायचे कसे? अशा गुंड प्रवृत्तीचे कार्यकर्ते यांच्यावर कायदेशिर देशाच्या संविधानाप्रमाणे कार्यवाही करावी व रोहन गलांडे यांना संरक्षण देण्यात आमच्या वाचकाची समर्थकांची मागणी आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi news paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# निंबायती गावात डेंग्यू सदृश तापेची साथ!

**आरोग्य** ६ वर्षीय बालिका छत्रपती संभाजीनगरला दाखल

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव च्या निंबायती गावात डेंगू सदृश तापेची साथीने वीस जणांना लागण झाली असून बुधवरी एका सहा वर्षीय बालिकेला डेंगू सदृश तापेने गंभीर झाल्याने छत्रपती संभाजीनगर च्या खासगी रुग्णालयात तातडीने उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे दरम्यान गावात डासांचे वाढते साम्राज्य आणि दुर्गंधी मुळे तापेची साथ पसरली आहे आरोग्य विभागाने याकडे दुर्लक्ष केल्या चा आरोप ग्रामस्थांनी केला आहे

निंबायती गाव येथे गेल्या तीन दिवसांपासून डेंगू सदृश तापेची साथ पसरली आहे शुक्रवारी वीस जण तापेने फणफणत असताना देखील तालुका आरोग्य विभागाने या गावात भेट दिलेली नाही निंबायती गाव हा भाग जरंडी प्राथमिक आरोग्य केंद्रात आहे या ठिकाणी कर्मचारी नसल्याचे सांगण्यात येत आहे मात्र गावात तापेची साथ गंभीर झालेली असूनही आरोग्य विभागाने गावात सर्वेक्षण हाती घेतलेले नसून




तापेच्या रुग्णांची संख्या वाढत आहे दरम्यान गावात रोहित्र जळले असल्याने अंधाराचे साम्राज्य आहे त्यामुळे रात्री हे गाव अंधारात राहत असून तापेच्या रुग्णांची कोंडी झाली आहे.

### आरोग्य विभागाचे दुर्लक्ष, रक्त नमुने प्रलंबित

आरोग्य विभागाने या साथी कडे दुर्लक्ष केले आहे अद्यापही गावात एकही आरोग्य कर्मचारी फिरकले नसून गावात ताप रुग्ण सर्वेक्षण हाती घेतले नसुन रक्त नमुने व उपचार करण्यात आले नव्हते त्यामुळे रुग्ण खासगी दवाखान्यात भरती होत आहे.

> निंबायती गावात तापेच्या साथी च्या रुग्णांचे सर्वेक्षण करण्याच्या सूचना शुक्रवारी दिलेल्या आहे त्यामुळे शनिवारी पथक गावात पोहचेल व त्यानंतर तापेच्या साथी चे निदान कळेल
>
> –डॉ गितेश चावंडा
> तालुका आरोग्य अधिकारी सोयगाव

# भाग्यश्री जाधवर क्रीडा स्पर्धेत प्रथम

**कौतुकास्पद:** बीडमध्ये जिल्हा मैदानी क्रीडा स्पर्धा

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील अकरावी वाणिज्य शाखेतील विद्यार्थिनी कुमारी भाग्यश्री बालासाहेब जाधवर जिल्हास्तरीय ३००० मी. धावण्याच्या स्पर्धेत प्रथम आलेली आहे.



दिनांक ४ ऑक्टोबर २०२४ रोजी बीड येथे झालेल्या जिल्हास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेत आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थिनी भाग्यश्री बालासाहेब जाधवर हिने १९ वर्ष वयोगटातून तीन हजार मीटर धावणे या क्रीडा प्रकारात जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळवला. त्याबद्दल भाग्यश्री बालासाहेब जाधवर आणि तिचे मार्गदर्शक वैभव खाडे सर, सेवानिवृत्त क्रीडाशिक्षक गणपत पांचाळ यांचे संस्थेचे सचिव बालासाहेब काकडे, संस्थेचे अध्यक्ष अशोकराव काकडे, कोषाध्यक्ष मुरलीधर काकडे आणि सर्व संचालक मंडळ ,मुख्याध्यापिका सिंधुताई चव्हाण, सुनील साळुंके, विष्णू कावळे, शिवाजी मांदळे ,संतोष रोकडे, शंकर पवार, उमाकांत मुंडे, निखिल भिसे, दिलीप पारेकर, सुनिल देवगावकर ,रामदास अंबाड, तुकाराम कापसे, सुरज लोखंडे, जगन्नाथ काळे, प्रमोद मोरे, रमेश कदम, साळुंके मॅडम,अंबड मॅडम, नरके मॅडम ,खेरूडकर मॅडम, यादव मॅडम, पाखरे मॅडम, सरवदे मॅडम, राठोड मॅडम, मोरे मॅडम, काळे मॅडम यांनी अभिनंदन केले.

# शेतकऱ्यांच्या खात्यावर निधी जमा!

## सोयाबीन, कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेल्यावर्षी खरीप हंगामात सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. या शेतकऱ्यांना हेक्टरी पाच हजार मदत देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार सोयगाव तालुक्यातील १८ हजार ८१३ शेतकऱ्यांच्या खात्यावर ९ कोटी १४ लाख रुपयांचा निधी जमा करण्यात आल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी मदन शिदोडिया यांनी दिली.शासनाने २०२३ साली खरीप हंगामात नुकसान व कमी भाव मिळाला असल्याने अनुदानाची घोषणा केली होती. अनुदानाची रक्कम निश्चित केल्यानंतर सोमवारपासून



शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा करण्यास सुरुवात झाली. अनुदानाची शेतकरी मोठ्या आतुरतेने वाट पाहात होत

शासनाने यापूर्वी जाहीर केलेल्या तारखांना अनुदान जमा न झाल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये निराशेचे वातावरण पसरले होते. पोळा, गौरी, गणपती सण होऊनही अनुदान जमा झाले नसल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला होता.सोमवारी सकाळी शेतकऱ्यांना हेक्टरी पाच हजार रुपयांची मदत दोन हेक्टर मर्यादेत जमा झाल्याचे मेसेज आले. सण, उत्सवाच्या काळात शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा झाल्याने मोठा दिलासा मिळला आहे.सोयगाव तालुक्यातील पात्र २४ हजार पाचशे एक शेतकऱ्यांपैकी २१ हजार ८१३ शेतकऱ्यांची इत्यंभूत माहिती शासनाच्या पोर्टलवर अपलोड करण्यात आली होती मात्र त्या पैकी चार हजार सहाशे खातेदार यांची अद्यापही ई केवायसी पूर्ण झालेली नसल्याने या शेतकऱ्यांना अर्थ सहाय्य खात्यात वर्ग झालेले नाही तसेच पात्र २४ हजार ५०१ शेतकऱ्यांपैकी मयत आणि शोध न झालेल्या शेतकऱ्यांना अनुदाना च्या यादीतून वगळण्यात आले आहे दरम्यान ई केवायसी न झालेल्या चार हजार सहाशे शेतकऱ्यांनी ई केवाय सी पुर्ण होताच त्यांना अनुदाना ची रक्कम खात्यात वर्ग होईल अशी माहिती तालुका कृषी अधिकारी मदन शिदोडिया यांनी दिली आहे.

# धाट सरांच्या ताब्यातले वृध्दाश्रम शेठने का हडपले?

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

प्राचार्य राजाभाऊ धाटसर हे अंबाजोगाईच्या संघ परिवारातील एक महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. स्वर्गीय गोपीनाथ मुंडे साहेब व प्रमोदजी महाजन साहेब यांच्या धाटसर अत्यंत जवळचे होते. धाट सरांनी खोलेश्वर कॉलेज कष्टानं उभ केल होत. मुंडे साहेब व धाट सर सुरुवातीला विद्यार्थी परिषदेत होते. त्यामुळे त्यांचे खूप जवळचे संबंध होते. १९९५ ला सेना भाजप युतीची सत्ता आल्यावर सरकारने वृध्दाश्रमची योजना आणली. यावेळी मुंडे साहेबांनी आपले जवळचे मित्र असलेल्या धाट सरांना अंकुर प्रतिष्ठान च्या माध्यमातून वृध्दाश्रम दिला. भाजपची सत्ता गेल्यावर मुंदडाने मुंडे साहेबाशी गद्दारी करुन राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये प्रवेश केला व सत्ता मिळवली.



सत्ता मिळाल्यावर शेठने भाजप व संघाच्या लोकावर सूड घ्यायला सुरुवात केली व मुंडे साहेबानी धाट सरांना दिलेला वृध्दाश्रम सत्तेची ताकद लाऊन काढून घेतला. हा वृध्दाश्रम चालवण्यासाठी धाट सरांनी खूप कष्ट घेतले होते. पण धाट सर मुंडे साहेबाच्या खूप जवळचे होते म्हणून त्यांना त्रास दिला गेला. संघपरिवारावर आपले वर्चस्व रहावे म्हणून शेठने फोडाफोडी सुरु केली. मुळचे कट्टर भाजपचे लोक बाजूला केले. व काही जणांना आपल मांजर बनवल. जनता बँकेतून काढून टाकलेल्या एका भ्रष्ट माणसाला दिनदयाळ मध्ये घूसवलं. कर्जाच्या फाईल मंजूर करण्यासाठी हा माणूस पैशे खायचा. कर्जाच प्रकरण मंजूर करण्यासाठी परमीट रुममध्ये मिटींग करायचा. कर्ज मागणा–या गरजू माणसानी शेठच्या या अधिका–याला दारुची पार्टी दिल्या शिवाय कर्जाची मंजूरी होत नाही. असे काही भाजपचे लालची लोकं शेठन जवळ केले व इथली भाजप संपवली. सध्या काहीजण शेठची हुजरेगिरी करतच आहेत. एखाद्या कुत्र्याने उष्ट्या खरकट्या पत्रावळी चाटून छाती फुगवून स्वाभिमानी असल्याचं दाखवावे तशा लोकांना या पुढं उघडे पाडूतच.पण भाजपची व संघाची जवळ राहून बेइमानी करणारे लोक पक्षाने व जनतेने ओळखले पाहिजेत.अनेक इमानदार लोकांनी त्रास सहन करुन हा पक्ष उभा केला आहे. हे लोक फक्त आपल्या विचाराशी बांधील आहेत. त्यांना हुजरे व चपराशी बनवण्याचा प्रयत्न शेठने करु नये असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये मतदार संघात सुरू झाले आहे.

# अल्पसंख्यांक समाजाला मुख्य प्रवाहात घेण्यासाठी कटीबध्द

**प्रकाश सोळंके :** पाणी पुरवठ्यासाठी ७० कोटींची तरतूद

धारुर/पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा समाजातील सर्व घटकांसह अल्पसंख्यांक समाजालाही मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कटिबध्द असल्याचे सांगत आजच मंत्रिमंडळ बैठकीत धारुर शहराच्या सुधारित पाणी पुरवठ्यासाठी ७० कोटी रुपयांची तरतुद युती शासनाने केली असल्याचे प्रतिपादन केले.

येथील तहसील कार्यालयासमोर असलेल्या कब्रस्तानला संरक्षक भिंत बांधण्याची अनेक वर्षांची मागणी होती. या तव्वकलशाह कब्रस्तानच्या संरक्षक भिंतीसाठी आमदार प्रकाश सोळंके यांच्या स्थानिक विकास निधितून २० लक्ष रुपये उपलब्ध करुन देत भिंत बांधकाम पुर्ण करण्यात आले. या भिंतीचा लोकार्पण कार्यक्रम आज दि.५ शुक्रवार रोजी घेण्यात आला. यावेळी आमदार सोळंके यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्यात लोकहिताचे काम करत असून अल्पसंख्यांक समाजाला मुख्य प्रवाहात घेण्यासाठी पक्ष कटिबध्द असल्याचे सांगितले. येत्या विधानसभा निवडणूकीत मुस्लिम समाजाला दहा टक्के जागा देण्याची घोषणा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी केले असून धारुर शहराच्या सुधारित पाणी पुरवठ्यासाठी ७० कोटी रुपयांची तरतुद राज्य शासनाने केल्याचे यावेळी सांगितले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ व्यापारी हाजी शेख अनिसोद्दीन तर प्रमुख पाहूणे म्हणून माजी नगराध्यक्ष लक्ष्मण सिरसट, गोपाळपुरचे सरपंच राजेश सोणवने, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष नितिन शिनगारे, एआयएमआयएम शहराध्यक्ष शेख मुबीन व मुस्लिम समाजातील ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्तविक शेख फसियोद्दीन यांनी केले. सुत्रसंचालन सय्यद शाकेर यांनी तर आभार ड. परमेश्वर शिनगारे यांनी मानले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने मुस्लिम युवक उपस्थित होते.

# महिलांना प्रोत्साहनासह सन्मान देखील द्या

**आ.पंकजा मुंडे :** केंद्राच्या 'धागा' प्रदर्शनाचे थाटात उदघाटन

पुणे/पुण्यभूमी प्रतिनिधी

महिला कुटुंब सावरण्यात हातभार लावते. महिलेने केवळ घर सांभाळावे आणि पुरुषांनी बाहेर कमवावे, अशी परिस्थिती आता राहिलेली नाही. तिच्या अंगी कलाकुसर, सचोटी, प्रामाणिकता, जिद्द, नीटनेटकेपणा असतो. एखाद्या गोष्टीसाठी आपण महिलांना प्रोत्साहन देतो; शक्ती देतो. मात्र, त्यांना शक्तीसोबत सन्मानही मिळाला, तर त्या विविध क्षेत्रात यशाची शिखरे गाठतात, असे प्रतिपादन भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांनी केले.

रमाबाई आंबेडकर महिला सबलीकरण केंद्रातर्फे आयोजित 'धागा' या स्वदेशी मेळ्याचे उद्घाटन पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते आज झाले. प्रसंगी संयोजक व राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी, 'द शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन ऑफ इंडियाचे' उपाध्यक्ष चारुदत्त देशपांडे, 'ब्रिहन्स नॅचरल प्रॉडक्ट'च्या संचालक शीतल आगाशे,



'एमएसएमई'चे सहसंचालक मिलिंद बारापात्रे, उपसंचालक अभय दफ्तरदार, माजी नगरसेवक दिलीप वेडेपाटील, जयंत भावे आदी उपस्थित होते.

गोल्डन लीफ लॉन्स, म्हात्रे पुलाजवळ, डीपी रस्ता, कर्वेनगर, पुणे येथे हे प्रदर्शन येत्या रविवारपर्यंत (ता. ६) सकाळी ९ ते रात्री ९ या वेळेत सर्वांसाठी विनामूल्य खुले राहील. वर्षा भिसे, केतकी तोरणे, रुपाली देसाई, गायत्री अकोलकर जोशी, पूजा किणीकर, अंजली रांजेकर, शिल्पा देशपांडे, योगिता जोग यांना 'यशस्वी उद्योजिका' पुरस्काराने मुंडे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. हँडलूम साड्या, ड्रेस मटेरियल, कुर्ती, ज्वेलरी, बॅग्स, कॉस्मेटिक्स, खाद्यपदार्थ असे वैविध्यपूर्ण स्टॉल्स या प्रदर्शनात आहेत.

# चिमुकलीवर शाळेत लैंगिक अत्याचार

## बदलापूर घटनेची माजलगावात पुनरावृत्ती

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्यात अल्पवयीन मुलीवर अत्याचाराचे सत्र सुरू असतानाच बीड जिल्ह्यातील माजलगाव शहरामधील एका नामांकित खाजगी शाळेत दि.२७ सप्टेंबर रोजी रोजी बालवाडी वर्गात शिकणाऱ्या पाच वर्षीय मुलीवर एका अनोळखी व्यक्तीने लैंगिक अत्याचार केल्याची संतापजनक घटना घडली आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की रोजच्याप्रमाने दि. २७ सप्टेंबर शुक्रवारी रोजी सकाळी आठ वाजता शाळेत गेली. यादरम्यान मध्यांतरनंतर एका खोलीत नेऊन मुलीचे कपडे व अंतर्वस्त्र काढून लैंगिक कृती करण्याचा प्रयत्न केला. याबाबत पीडित मुलीने आपल्या पालकांना दि.२ ऑक्टोबर रोजी घडलेला प्रकार सांगितला. पालकांनी माजलगाव शहर पोलीस स्टेशन ठाण्यात अनोळखी इसमाविरुद्ध कलम६५(२) इछ्ड सह कलम४/६ बालकाचा लैंगिक अत्याचार कायदा पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील घटनेचा तपास आयपीएस डॉ. धीरजकुमार बच्चू, पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय एस. एल. दिंडे हे करत आहेत. सदरील घटनेने माजलगावसह शैक्षणिक क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

**पडघम** विनय भांगेविरुद्ध देवेंद्र फडणवीस लढत

# वंचितचा राज्यातील सर्वात चर्चित चेहरा



नगर/पुण्यभूमी प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा अँड प्रकाश आंबेडकर यांनी आपला सर्वात विश्वासू युवा नेता विनय भांगे यांना राज्याचे उपमुख्यमंत्री ना देवेंद्र फडणवीस यांचा विरोधात उमेदवारी दिली आहे वंचितचा राज्यातील सर्वाधिक चर्चे तील युवा चेहरा म्हणून विनयजी भांगे यांच्या कडे पाहिले जाते

> ### साहेबांचा विचारांचे स्वागत व समर्थन!
>
> आम्ही वंदनीय डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी नमुद केलेल्या संविधाननातील आरक्षणातील बदल करण्याचा प्रयत्न करणा–या आणि सामाजिक न्यायात फुट पाडणाऱ्या राजकारणात यांचा विरोधात ठामपणे उभे आहोत मी आदरणीय अँड प्रकाश आंबेडकर यांच्या विचारांचे स्वागत व समर्थन करतो
>
> विनयजी भांगे
> उमेदवार, वंचित दक्षिण पश्चिम नागपूर

नागपूर दक्षिण पश्चिम विधानसभा मतदारसंघातून विनय भांगे यांना वंचितने मैदानात उतरवले आहे त्यांची संभाव्य लढत ही दस्तखुद राज्याचे उपमुख्यमंत्री ना देवेंद्र फडणवीस यांचा बरोबर होणार आहे विनय भांगे हे नागपुरातील एक शेतकरी परिवारातील आहेत भांगे कुटुंबिय हे आंबेडकर घराण्याला समर्पित घराणे आहे विनय भांगे यांची तिसरी पिढी आंबेडकर घराण्याशी एकनिष्ठ आहे

विनय भांगे यांच्या आजोबांनी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर मिलिंद महाविद्यालयात शिक्षण घेतले आहे व त्यांचा वडीलांनी नागपूर मध्ये आपले संपूर्ण आयुष्य आंबेडकरी समाजासाठी समर्पित केले आहे विनय भांगे हे एलएलबी आणि एमबीए केले असून दिक्षाभुमी बचाव आंदोलन दिक्षाभुमी समिती रद्द आपली दीक्षाभूमी स्वछ भूमी स्वच्छता अभियान आदी आंदोलन विशेष करून गाजली आहे त्यांनी आदरणीय अँड प्रकाश आंबेडकर यांच्या सोबत नुकतेच आरक्षण बचाओ आंदोलन यात्रे मध्ये ४०००हजार किलोमीटरची सक्रीय सहभाग घेतला होता तसेच अनेक सामाजिक धार्मिक उपक्रमात त्यांचा लक्षणिय सहभाग असतो.

# बांधकामांचे पैसे कधी मिळणार?

**दुर्लक्ष:** शेतकरी पंचायत समितीत चकरा मारून हैराण

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील फळबाग व गायगोठा बांधकामाची रक्कम अजूनही जमा झाली नसल्याने सोयगाव शेतकरी पंचायत समितीत चकरा मारून हैराण झाले आहेत.

> ### शेतकऱ्यांचा सामूहिक आंदोलनाचा इशारा
>
> योजनेचा लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यावर कुशल कामाचे रक्कम जमा झाले नाही. या भागाचे रोजगार हमी योजनाचे दोन्हीही अभियंता सचिन चव्हाण व राहुल राठोड हे पंधरा दिवसांपासून कार्यालयात फिरकले नाहीत. शेतकऱ्यांची कामे होऊन ही या अभियंत्यांनी अद्यापही कामांची मोजमाप पुस्तिका तयार केली नाही अनुदानाची रक्कम लवकर शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करा अन्यथा सामूहिक आंदोलन करण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

फळबाग लागवड, जनावरांचा गोठा बांधकाम केलेल्या शेतकऱ्यांचे पैसे मिळत नसल्याने शेतकरी रोजगार हमी योजना विभागात येऊन विचारणा करीत आहेत.जरंडी, बनोटी, गोंदेगाव,सावळदबारा,या परिसरातील आदींसह अनेक गावांत रोजगार हमी योजनांतर्गत अनेक गावात रोजगार हमी ची कामे झाली आहे फळबाग लागवडीसाठी सात लाख पर्यंत अनुदान तीन वर्षांत दिले जाते. विहीर व गाय गोठा योजनेसाठी दोन लाख व चार लाख असे अनुदान दिले जाते दरम्यान गाय गोठा व विहिरी मंजुरी मिळाल्यानंतर शेतकऱ्यांनी जवळून पैसा खर्च करून कामे केली. मात्र, अजूनही पैसे कुशल कामाची रक्कम लाभार्थी शेतकऱ्यांना खात्यावर जमा झालेली नाही एकीकडे शेतकऱ्यांना झालेल्या कामांची देयके जमा झाली नसून दुसरीकडे जिल्हा परिषदेच्या रोजगार हमी योजनेने नवीन कामांची मंजुरी व देयके खात्यात वर्ग करण्यासाठी पोर्टल बंद केले आहे दरम्यान शेतकऱ्यांनी कामांची दिलेले बिले संबंधित रोजगार हमी विभागातील कर्मचाऱ्यांनी ऑनलाइन केले नसल्याने शेतकऱ्यांना कुशल बिले मिळण्यासाठी अडचणी निर्माण झालेल्या आहे या योजनेतील काही शेतकऱ्यांनी व्याजाने रक्कम काढून गाय गोठा विहीर व फळबाग लागवड आदी कामे केली आहे

# कणकुंबीजवळ ४७ लाखाची दारू जप्त

## अबकारी खात्याची पुन्हा मोठी कारवाई

देशोन्नती वृत्तसंकलन

**बेळगाव :** खानापूर तालुक्यातील कणकुंबी येथील अबकारी तपास नाक्याजवळ गोव्याहून येणाऱ्या एका आयशर कंटेनरची झडती घेतली असता गोवा बनावटीची तब्बल ४६ लाख ९६ हजार रुपयांची दारू आढळून आली. अबकारी पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे बेळगाव जिल्ह्यात खळबळ उडाली असून सदर दारू व कंटेनर अबकारी पोलिसांनी जप्त करून गुन्हा दाखल केला आहे. सोमवारी मध्यरात्री गोव्याहून कंटेनर क्रमांक जी जे १८, बी व्ही ७८४९ हा बेळगावकडे येत होता. यावेळी तेथील




अबकारी पोलिसांनी वाहनाच्या कागदपत्रांची तपासणी केली. त्यामध्ये पोलिसांना संशय आलाकंटेनरमध्ये प्लॅस्टिक बकेट व इतर साहित्य असल्याचे दाखविण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, अबकारी पोलिसांनी वाहनामध्ये तपास केला असता आतमध्ये ग्रीन व्हिस्की तसेच इतर दारूचे बॉक्स असल्याचे नजरेला पडले. यावेळी चालकाने तेथून पलायन केले.

# तिरूपती लाडू प्रसाद भेसळ चौकशी थांबली

## आंध्रप्रदेश सरकारने घेतला निर्णय

देशोन्नती वृत्तसंकलन

**विजयवाडा :** तिरुपती लाडू प्रसाद भेसळप्रकरणी चौकशी काही काळ थांबविण्याचा निर्णय आंध्र प्रदेश सरकारने घेतला आहे. सर्वोच्च न्यायालयाने तसा आदेश सोमवारी केलेल्या सुनावणीनंतर दिला होता. त्यानुसार न्यायालयाच्या निर्णय येईपर्यंत चौकशी पुढे चालविली जाणार नाही, अशी घोषणा आंध्र प्रदेश सरकारने केली आहे. भगवान व्यंकटेश्वराच्या लाडू प्रसादात गाय, डुक्कर आदी प्राण्यांच्या चरबीची भेसळ करण्यात आली आहे. असा अहवाल देशातील चार




प्रयोगशाळांनी काही दिवसांपूर्वी पाठविला होता. नंतर या प्रकरणाला राजकीय रंगही प्राप्त झाला होता. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी मागच्या वायएसआर काँग्रेस सरकारच्या काळातही भेसळ झाली, असा आरोप केला होता. मात्र, तो माजी मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांनी फेटाळला होता. त्यानंतर हे प्रकरण आता सर्वोच्च न्यायालयात पोहचले आहे.

# नैऋत्य मान्सूनला हिमाचलमधून अंतिम निरोप

वृत्तसंस्था

**शिमला :** नैऋत्य मान्सूनने बुधवारी हिमाचल प्रदेशातून प्रस्थान केले असून सामान्यपेक्षा १८ टक्के कमी पाऊस झाला आहे. यंदाच्या पावसाळ्यात राज्यात ६००.९ मिमी पाऊस झाला, जो गेल्या १२४ वर्षांतील ९७ वा सर्वाधिक पाऊस आहे. तथापि, १९०१ ते २०२४ या कालावधीत सर्वाधिक पाऊस (१३१४.६ मिमी) १९२२ मध्ये नोंदवला गेला. २७ जून रोजी मान्सून राज्यात दाखल झाला होता. २७ जून ते ३० सप्टेंबरपर्यंत राज्यात ६००



### १२४ वर्षांतील सर्वाधिक पावसाची नोंद

मिमी पाऊस पाडला. राज्यातून नैऋत्य मान्सून माघारीची सर्वसाधारण तारीख २५ सप्टेंबर आहे. गेल्या वर्षी मान्सूनने ६ ऑक्टोबरला प्रस्थान केले होते. मान्सूनमध्ये जूनमध्ये राज्यभरात सरासरीपेक्षा ५४ टक्के कमी, जुलैमध्ये २९ टक्के कमी आणि ऑगस्टमध्ये ५ टक्के कमी पावसाची नोंद झाली आहे. सप्टेंबरमध्ये राज्यात ४ टक्के अधिक पाऊस झाला.

# युनो सरचिटणीस गुटेरेस यांना इस्त्रायलमध्ये प्रवेश बंदी!

## हल्ल्याचा निषेध न केल्याने 'नॉन ग्राटा'

वृत्तसंस्था

**संयुक्त राष्ट्रः** इराणने इस्रायलावर केलेल्या हल्ल्यानंतर दोन्ही देशांमधील संघर्ष आता आणखी तीव्र होणार असल्याचे संकेट मिळत आहे. दरम्यान, संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांना इस्रायलने नॉन ग्राटा (अशी व्यक्ती जिला कोणताही आदर किंवा स्वागत होणार नाही) म्हणून घोषित केले आहे. त्यांना देशात प्रवेश करण्यास बंदी घातली आहे.

इस्रायली लष्कराने लेबनॉनमध्ये घुसून हिजबुल्लाहच्या सैनिकांवर हल्ले करण्यास सुरुवात केली. यानंतर इराणने इस्त्रालयवर १८० हून अधिक क्षेपणास्त्र डागली. या दोन्ही देशांमधील संघर्ष अधिक तीव्र झाला आहे. इस्रायलचे परराष्ट्र मंत्री कॅट्झ यांनी एक निवेदन जारी करून म्हटले आहे की, जो कोणी इराणच्या इस्रायलवरील गुन्हेगारी हल्ल्याचा निःसंदिग्धपणे निषेध करू शकत नाही, तो इस्रायलच्या भूमीवर पाय ठेवण्याच्या लायकीचा नाही. हे (गुटेरेस) दहशतवादी, बलात्कारी आणि खुन्यांना पाठिंबा देणारे गुटेरेस आहेत.

# रहस्यमय पत्रांमुळे ग्रामस्थांचे स्थलांतर; शिप्टोनथॉर्प गावावर ओढवले विचित्र संकट

वृत्तसंस्था

**ब्रिटनः** एखाद्याला धमकीयुक्त पत्र मिळाल्याचे वृत्त वाचनात आले असेल, अनेकदा एखाद्याचा शत्रू अशाप्रकारच्या कृत्यांद्वारे त्याला घाबरविण्याचा प्रयत्न करत असतो; परंतु अलीकडेच इंग्लंडच्या ईस्ट यॉर्कशायरमधून काहीसे अजब आणि भीतीदायक वृत्त समोर आले आहे. येथील गाव शिप्टोनथॉर्पच्या जवळपास सर्व लोकांना अशाप्रकारचे रहस्यमय पत्र २ वर्षांपासून प्राप्त होत आहे. अज्ञात लेखकाच्या या पत्रांना अश्लील आणि टार्गेटेड ठरविले जात आहे. हंबरसाइड पोलीस धमकी आणि शिव्यायुक्त पत्रांच्या या अजब प्रकरणाचा तपास करत आहेत.



डिसेंबर २०२२ मध्ये असे एक पत्र मिळाल्यावर मला धक्काच बसला होता. त्यावेळी मी एका वॉर्डची प्रतिनिधी म्हणून काम करत होते आणि पत्रातील मजकूर भीती निर्माण करणारा होता. पत्र लिहिणाऱ्याने मला चरित्रहीन संबोधिले होते. राजकारणात पुढे जाण्यासाठी माझ्याकडे केवळ चुकीचा मार्ग स्वीकारण्याचा पर्याय असल्याचे पत्रात नमूद होते असे एका स्थानिक महिलेने नाव न जाहीर करण्याच्या अटीवर सांगितले आहे.

# बांगलादेशने भारतासह पाच देशातील राजदूतांना परत बोलावले

देशोन्नती वृत्तसंकलन

**ढाका :** बांगलादेशच्या अंतरिम सरकारने भारतासह पाच देशांतील राजदूतांना परत बोलावले आहे. भारताव्यतिरिक्त ऑस्ट्रेलिया, बेल्जियम, पोर्तुगाल आणि संयुक्त राष्ट्रातून बांगलादेशच्या राजदूतांना परत बोलावण्यात आले आहे. शेख हसिना पंतप्रधानपदावरून पायउतार झाल्यानंतर बांगलादेश आणि भारत यांच्यातील संबंध काही विशेष राहिलेले नाहीत. त्याच वेळी, बांगलादेशच्या परराष्ट्र मंत्रालयाशी संबंधित लोकांचे असे मत आहे की प्रशासकीय विभागाचे आदेश देशाच्या परराष्ट्र धोरणासाठी चांगले नाहीत. या लोकांचे म्हणणे आहे की, भारतातील उच्चायुक्तांसह ज्या राजदूतांना परत बोलावण्यात आले आहे, त्यापैकी अनेक राजकीय नियुक्ती करणारे नव्हते.

भारतातील उच्चायुक्त मुस्तफिजुर रहमान व्यतिरिक्त,



इतर ज्यांना परत बोलावण्यात आले त्यात न्यूयॉर्कमधील संयुक्त राष्ट्राचे स्थायी प्रतिनिधी आणि ऑस्ट्रेलिया, बेल्जियम आणि पोर्तुगालमधील बांगलादेशचे राजदूत यांचा समावेश आहे. ज्या राजदूतांना परत बोलावण्यात आले ते येत्या काही महिन्यांत निवृत्त होणार होते. भारतातील उच्चायुक्त रेहमान यांचाही त्यात समावेश आहे. बांगलादेशात विद्यार्थी संघटनांच्या नेतृत्वाखाली सातत्याने निदर्शने सुरू होती.



## तुम्ही अशा संस्थांमध्ये पोलीस किंवा सैन्य घुसवू शकत नाही - सर्वोच्च न्यायालय

# ईशा फाऊंडेशनच्या कारवाईला स्थगिती

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी दिल्लीः** सद्गुरू जग्गी वासुदेव यांच्या ईशा फाऊंडेशनच्या कोइम्बतूर आश्रमाची पोलिसांनी मंगळवारी झडती घेतली होती. डॉ. एस. कामराज यांनी मद्रास उच्च न्यायालयात याचिका दाखल करून त्यांच्या दोन मुलींना आश्रमात डांबून ठेवल्याचा आरोप केला होता. न्यायालयाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत फाऊंडेशनविरोधात दाखल सर्व गुन्ह्यांचा तपशील सादर करण्याचे आदेश दिल्यानंतर पोलिसांनी कारवाई केली होती. आता या कारवाईवर सर्वोच्च न्यायालयाने भाष्य केले आहे. तसेच मद्रास उच्च न्यायालयाने जे कारवाईचे आदेश दिले होते, त्यावर स्थगिती आणण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. 'तुम्ही अशा संस्थांमध्ये पोलीस किंवा सैन्य घुसवू शकत नाही', अशी टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी केली. तसेच ज्या दोन महिलांशी हे प्रकरण निगडित आहे, त्यांच्याशी सर्वोच्च न्यायालय सरन्यायाधीशांच्या दालनात संवाद साधला असेही त्यांनी सांगितले. महिलांच्या साक्षीवरून त्यांच्या स्वेच्छेने आश्रमात राहण्याबाबत शंका घेण्यास जागा नाही, असे खंडपीठाने म्हटले आहे. दोन्ही महिलांनी साक्ष दिली की ते त्यांच्या स्वेच्छेने आश्रमात राहतात आणि त्यांच्या वडिलांनी केलेल्या दाव्याचे खंडन केले.

### सर्वोच्च न्यायालयात १८ ऑक्टोबर सुनावणी

खंडपीठाने हे प्रकरण उच्च न्यायालयाकडून स्वतःकडे हस्तांतरित करण्याचे निर्देश दिले आणि तामिळनाडू पोलिसांना या प्रकरणात पुढील कारवाई करण्यापासून रोखत सर्वोच्च न्यायालयात आपला स्थिती अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. वरिष्ठ अधिवक्ता सिद्धार्थ लुथरा यांनी राज्य सरकारची बाजू मांडताना सांगितले की, पोलिसांनी उच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन केले आणि आश्रमातील तपास बाल संरक्षण अधिकाऱ्यांसह सर्व योग्य उपाययोजना आणि संसाधनांसह केला गेला. सर्वोच्च न्यायालयात १८ ऑक्टोबर रोजी पुन्हा सुनावणी होणार आहे.

# विमानतळावर दुसऱ्या महायुद्धाच्या वेळेच्या बॉम्बचा स्फोट; 80 उड्डाणे रद्द

वृत्तसंस्था

**टोकियो :** जपानच्या विमानतळावर बुधवारी दुसऱ्या महायुद्धातील अमेरिकन बॉम्बचा स्फोट झाला. हा बॉम्ब बऱ्याच काळापासून येथे पुरला होता. त्यामुळे टॅक्सीवेमध्ये मोठा खड्डा पडला आणि ८० हून अधिक उड्डाणे रद्द करावी लागली. या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

दक्षिण-पश्चिम जपानमधील मियाझाकी विमानतळावर स्फोट झाला तेव्हा जवळपास कोणतीही विमाने नव्हती. अधिकाऱ्यांनी सांगितले की तपासात पुष्टी झाली आहे की ५०० पाउंड अमेरिकन बॉम्बमुळे स्फोट झाला होता आणि



यापुढे कोणताही धोका नाही. अचानक स्फोट कशामुळे झाला हे शोधण्याचा प्रयत्न करत आहेत. याचा एक व्हिडिओही व्हायरल झाला आहे. जपानी टेलिव्हिजनवर प्रसारित केलेल्या व्हिडिओमध्ये टॅक्सीवेमध्ये सुमारे सात मीटर व्यासाचा आणि तीन फूट खोल खड्डा दिसला. मुख्य कॅबिनेट सचिव योशिमासा हयाशी यांनी सांगितले की, विमानतळ गुरुवारी पुन्हा सुरू होण्याची अपेक्षा होती.

# इस्त्रायलचे 11 नेते इराणच्या रडारवर

वृत्तसंस्था

**तेल अवीव :** इराणने इस्रायलच्या नेत्यांची मोस्ट वॉन्टेड यादी जाहीर केली आहे. या यादीत एकूण ११ इस्रायली नेत्यांची नावे आहेत.

पंतप्रधान नेतन्याहू यांचे नाव पहिल्या क्रमांकावर असून त्यांनी नेतान्याहू यांनाच दहशतवादी म्हटले आहे. याशिवाय इस्त्रायलचे संरक्षण मंत्री योव गॅलांट आणि लष्करप्रमुख हरजी हालेवी यांचीही नावे यादीत आहेत. इराणने जारी केलेल्या यादीत त्यांचे वर्णन इस्रायली दहशतवादी म्हणून करण्यात आले आहे. दरम्यान, ज्या वाहिनीने ही बातमी सूत्रांच्या हवाल्याने दिली आहे त्यांनी मात्र या यादीची सत्यता आपण पडताळली नसल्याचे अगोदरच स्पष्ट केले आहे.

### नेतान्याहू पहिल्या क्रमाकांवर



इराणने इस्रायलवर केलेल्या हल्ल्यानंतर इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी इराणला नष्ट करण्याची शपथ घेतली आहे. इराणला प्रत्युत्तर देण्यासाठी इस्रायल आता पूर्णपणे तयार आहे. पंतप्रधान नेतान्याहू तेल अवीवमधील संरक्षण मंत्रालयाच्या मुख्यालयात सुरक्षा प्रमुखांची भेट घेत आहेत. अशा स्थितीत इस्रायल लवकरच इराणवर भीषण हल्ला करू शकेल, अशी शक्यता वर्तवली जात आहे. इस्रायलच्या पंतप्रधान कार्यालयाने एका निवेदनात म्हटले आहे की, पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी आज तेल अवीवमध्ये सुरक्षा प्रमुखांशी चर्चा केली. टाईम्स ऑफ इस्रायलच्या वृत्तानुसार, इस्रायलच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की इराणच्या मोठ्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्र हल्ल्याला इराण गॅस आणि तेल यांसारख्या पायाभूत सुविधांवर हल्ला करून किंवा थेट इराणच्या तेल सुविधांवर हल्ला करून प्रत्युत्तर देऊ शकतो; परंतु हा हल्ला त्या देशाचा नाश करू शकतो. दरम्यान, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बायडेन म्हणाले की, त्यांचे प्रशासन इस्रायलला पूर्ण पाठिंबा देत आहे.

# बाजारातील दुर्गंधीमुळे विक्रेते ग्राहक हैराण

**पणजी :** नव्या जागेत स्थलांतरित केलेल्या पणजीच्या मासळी बाजारात विक्रेत्यांसह ग्राहकांनाही त्रासाला सामोरे जावे लागत आहे. येथे पाणी वाहून जाण्यासाठी योग्य सुविधा नसल्याने ते साचून राहत आहे. यामुळे या भागात दुर्गंधी पसरली आहे. पणजी बाजाराची जुनी इमारत धोकादायक झाल्याने ती पाडण्यात येणार आहे. यामुळे सध्या मासळी बाजार येथील पार्किंग परिसरात हलवण्यात आला आहे.

मासळी बाजाराच्या नवीन जागेची शेड उभारण्याचे काम मागील शुक्रवारी पूर्ण झाले होते. यानंतर सोमवारपासून येथे विक्री सुरू झाली आहे.

# कासवांच्या अनेक प्रजाती नष्ट होण्याचा धोका

## जायंट सॉफ्ट शिल्ड टर्टल दुर्मिळ प्रजाती

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी दिल्ली :** कासवांना आपण दीर्घायुष्यी प्राणी मानतो. मात्र, माणसाचा धोका अन्य प्रजातींप्रमाणेच कासवांनाही भेडसावत आहे. जगातील कासवांच्या अनेक प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. काही वर्षांपूर्वी लॉन्सम जॉर्ज नावाच्या कासवाचा मृत्यू झाला. पिंटा आयलंड जायंट प्रजातीतील तो अखेरचा कासव होता. पृथ्वीवर तो एकटाच उरल्याने एकांगी जीवन त्याच्या मृत्यूसाठी कारणीभूत ठरले. ८ जुलै २०१२ मध्ये तो मृत पावला आणि पृथ्वीवरूनच ही प्रजाती संपली. आता जायंट सॉफ्ट शिल्ड टर्टल ही पृथ्वीवरील कासवांची दुर्मिळ प्रजाती ठरली आहे.

जगातील मोठ्या गोड्या पाण्यातील हे कासव आता अवघे चारच उरले आहेत. दुर्मिळ होत चाललेल्या वन्यप्राण्यांचा अभ्यास करणाऱ्या 'इंडेन्जर्ड वाईल्डलाईफ ट्रस्टच्या अभ्यासातून हे वास्तव यापूर्वीच समोर आलेले आहे. भारतात कासवांच्या सर्वाधिक प्रजाती असून त्यातील अनेक दुर्मीळ होत असून नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. खाण्यासाठी, फेंगशुई, जादूटोणा आदींसाठी शिकार आणि त्याचा व्यवहार लाखो आणि कोटी रुपयांच्या घरात होतो.



**बस्तरः** छत्तीसगडमधील बस्तर येथील देवीच्या मंदिरात दरवर्षी नवरात्रीच्या आधी रात्री उशिरा फक्त तृतीयपंथी समाजालाच देवी दंतेश्वरीचे पहिले दर्शन होते. यावर्षीही तृतीयपंथी समाजाने देवीचे दर्शन घेण्यासाठी बुधवार आणि गुरुवारी मध्यरात्री बस्तरची आराध्य देवी दंतेश्वरीच्या मंदिरात प्रथम येत दर्शन घेतले.

# 8 वर्षाच्या मुलाने ऑनलाइन मागविली एके-47!

वृत्तसंस्था

**नेदरलँड :** एका ८ वर्षाच्या मुलाने डार्क वेबच्या माध्यमातून एके ४७ ऑनलाइन ऑर्डर केली. आश्चर्यकारक बाब म्हणजे ही रायफलही त्यांना देण्यात आली. हा धक्कादायक किस्सा खुद्द मुलाच्या आईनेच सांगितला आहे. प्रकरण नेदरलँडचे आहे. महिलेने दावा केला की तिच्या ८ वर्षांच्या मुलाने तिच्या नकळत ऑनलाइन एके-४७ खरेदी केली होती. ही रायफल घरी पोहोचल्यावर त्याला धक्काच बसला. त्याने ताबडतोब माहिती गोळा करण्यास सुरुवात केली तेव्हा त्याला कळले की यामागे इंटरनेटचे गडद जग आहे, गडद वेब आहे, जिथे अशा बेकायदेशीर कारवाया बिनदिक्कतपणे केल्या जातात.

मांजरीच्या नृत्याचे सीसीटीव्ही फुटेज व्हायरल झाले डार्क वेब हा इंटरनेटचा एक भाग आहे जिथे उददुत,ँग्हु सारख्या सर्च इंजिनद्वारे सामग्रीमध्ये प्रवेश केला जाऊ शकत नाही. यासाठी विशेष ब्राउझर आणि परवानग्या आवश्यक आहेत. डार्क वेबवरील सामग्री कोणत्याही कायद्याच्या कक्षेत येत नाही. याद्वारे ड्रग्ज आणि शस्त्रास्त्रांसह अनेक बेकायदेशीर कामे केली जातात. हे कांदा राउटिंग तंत्रज्ञानावर कार्य करते, एके-४७ जे वापरकर्त्यांना ट्रॅकिंग आणि पाळत ठेवण्यापासून संरक्षण करते.

# 7 दिवसांत 100 नसराल्लाहचा जन्म!

वृत्तसंस्था

**बेरूत :** हिजबुल्ला प्रमुख हसन नसराल्लाह यांच्या मृत्यूबद्दल अनेक मुस्लीम देशांनी चिंता व्यक्त केली. हिजबुल्लाह प्रमुखाच्या मृत्यूमुळे संतप्त झालेल्या लोकांनी म्हटले होते की, जर इस्रायलने हसन नसराल्लाहला मारले तर हजारो लोक त्याच्या पावलावर पाऊल ठेवण्यास तयार होतील.

### इराकच्या आरोग्य मंत्रालयाने दिली माहिती

दरम्यान, इराकमध्ये सुमारे १०० नवजात बालकांचे नाव नसराल्लाह ठेवण्यात आले आहे. इराकच्या आरोग्य मंत्रालयाने ही माहिती दिली आहे. मंत्रालयाने सांगितले की नसराल्लाह नावाच्या १०० मुलांच्या जन्माची नोंद झाली आहे.

# कुमारस्वामींच्या अडचणीत वाढ

**बेंगळुरू :** कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री आणि जेडीएस नेते कुमारस्वामी अडचणीत सापडले आहेत. कुमारस्वामी यांच्यासह आमदार रमेश गौडा यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जेडीएसचे सोशल मीडिया उपाध्यक्ष विजय टाटा यांनी दोन्ही नेत्यांवर ५० कोटी रुपयांची लाच मागितल्याचा आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप केला आहे.

# गोव्यात आंतरराष्ट्रीय पर्यटन हंगामाचा श्रीगणेशा

देशोन्नती वृत्तसंकलन

**पेडणे :** गोव्यात आजपासून अधिकृतरित्या आंतरराष्ट्रीय पर्यटन हंगामाची सुरुवात झाली. रशियातील मॉस्को व यात्तरीनबर्ग येथील प्रवाशांना घेऊन यंदाच्या हंगामातील पहिली दोन चार्टर विमाने मोपाच्या मनोहर आंतराष्ट्रीय विमानतळावर उतरली. मिळालेल्या माहितीनुसार एका फ्लाईटमधून २१० तर दुसऱ्या फ्लाईटमधून १३९ असे मिळून तब्बल ३४९ विदेशी पर्यटक गोव्यात दाखल झाले आहेत. या सर्वांचे मोपा आंतरराष्ट्रीय विमानतळावर जोरदार स्वागत करण्यात आले. दरम्यान, पर्यटकांच्या आगमनाने टॅक्सी चालक, हॉटेल व्यावसायिक आणि पर्यटन क्षेत्राशी संबंधित घटकांत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पर्यटन मंत्री रोहन खंवटे यांनी गोव्यात येणाऱ्या सर्व पर्यटकांना आवश्यक त्या सुखसोई पुरवण्यावर सरकारचा भर आहे. पंचायत, पालिका तसेच स्थानिक आमदारांनी यात लक्ष घालत पर्यटकांची गैरसोय होणार नाही खबरदारी घ्यावी असे म्हटले आहे. पर्यटकांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी भासल्यास त्या पर्यटन खात्यातर्फे तात्काळ सोडवल्या जातील असेही ते म्हणाले.

### रशियातून दोन चार्टर विमानांचे आगमन

**नागरिक व्यावसायिकांना दिलासा**

पर्यटन हंगाम सुरू झाल्याने पर्यटनाशी संबंधित सर्व व्यावसायिकांना दिलासा मिळाला आहे. किनाऱ्यावरील शॅक्समालकांतर्फे पुढाकार घेऊन अत्यंत गरजेच्या सुखसुविधा येत्या काही दिवसांत पर्यटकांसाठी उपलब्ध केल्या जातील. गोवा सरकार व पर्यटन खाते पर्यटन व्यवसायाला चालना देण्यासाठी नेहमीच अभिनव उपक्रम राबवते.



# अनेक भावी सेटलमेंटच्या प्रतीक्षेत!

## मतदार म्हणाले!लढणारचं म्हणणाऱ्यांनी लढावे

## ऐनवेळी माघार घेणाऱ्यांना, लोक ओळखून?

## पैशाच्या अशाने विधानसभेच्या उमेदवारीचा भपका !

## समाजासाठी काम करा समाज तुम्हाला आमदार करेल!

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

विधानसभा निवडणूक काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. जसजसं निवडणुकीचे वातावरण तापत आहे. तसतसं गेवराई विधानसभेचे राजकारणही तापत आहे. आमदार म्हटले की तालुक्याचा प्रमुख, तो होण्याचे स्वप्न राजापासून तर रंकाला पडायला लागलं. समाजसेवेच, गोरगरिबांसाठीच काम असो किंवा नसो, ते गेले सार चुलीत. पण आपल्याला मात्र आमदार व्हायचं. आतापर्यंत फक्त भावी भावी भावीच ऐकत होतो. आता काहीजण तर मी लढणारच इथपर्यंत येऊन ठेपले. बरं तुम्ही लढणारच पक्षाने जर उमेदवारी नाही म्हटली तरी लढणार का? असा सवाल गरीबी बिचारी मनात येऊ लागला. डायरेक्ट सांगायचं की पक्ष असो किंवा अपक्ष निवडणूक मात्र लढणारच आणि तुमची सेवा करणारच. कारण काहीजण



फक्त सेटलमेंट व काय भेटेल म्हणून आपलं तुंतून वाजवू लागले. तसं पाहायला गेलं तर मतदार आपला भोळा भाबडा परंतु वेळेवर आपले काम दाखवणारा. यापूर्वी आपण किती समाजसेवा केली, किती आंदोलन केले, किती शेतकऱ्यांसाठी धावून गेला, याचबरोबर किती समाजसेवेच्या नावाखाली तह केले, किती घेतले, किती सोडले याच्यावर बी, गरीब मतदाराचे लक्ष असते बघा. म्हणून मतदाराचा आणि समाजाचा विकास पाहिजे असेल तर आमदार होण्यापूर्वी गोरगरिबाची सेवा, समाजाची सेवा, अडल्या नडल्यांची सेवा करायच पुण्य लाभून जनताच तुम्हाला उभा करेल आणि आमदार करील. त्यामुळे धमक्या दिल्यागत बॅनरबाजी व भक्केबाजी करू नये आणि लढणार म्हणल्यावर लढायलाच हवं हीच सर्वसामान्य ची इच्छा.

या बाबत सविस्तर माहिती अशी की, विधानसभा निवडणूक काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. येत्या काही दिवसांमध्ये आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. तसतशी गेवराई विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांची संख्या वाढताना पाहायला मिळत आहे. आमदार होण्याचे स्वप्न हे कोणी पण पाहू शकतो. तो अधिकार सर्वांना आहे. परंतु आमदारकी ही आइश आराम करण्यासाठी नसून समाजाची सेवा करण्यासाठी आहे हा हेतूच अनेक जण विसरले आहेत. अनेक जण आमदारकीचे बॅनर लावण्यामध्ये मोठेपणा समजत असून यासाठी काम मात्र कार्यशून्य असल्याचे चित्र मतदारसंघात आहे. विधानसभा मतदारसंघाला सर्वसामान्यतील आमदार व्हावा अशी सर्व सामान्य ची इच्छा आहे. परंतु शुद्ध हेतू असलेला उमेदवार सध्या मिळण्यास तयार नाही. अनेक जण सध्या म्हणतायेत मी लढणारच पण ऐनवेळी माघार घेऊ नये कारण अनेक जणांनी फक्त पान २ वर...


# जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये गुरुकुल स्कूल अजिंक्य

## कृष्णा गायकवाड आणि आरशान पठाण पुन्हा चमकले

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शालेय क्रिकेटच्या जिल्हास्तरीय स्पर्धा शिदोड येथील डी. एस. के. क्रिकेट ग्राउंड वर घेण्यात आल्या या स्पर्धा जिल्हा क्रीडा कार्यालय बीड व क्रीडा युवा सेवा संघ महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या अंतर्गत घेण्यात आल्या या स्पर्धेमध्ये १४ वर्षाखालील मुलांच्या गटामध्ये एकूण ११ तालुक्याच्या संघांनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेमध्ये खेळत असताना गुरुकुल इंग्लिश स्कूल ने प्रथम मॅच मध्ये शिरूर तालुका, द्वितीय मॅच मध्ये आंबेजोगाई तालुका, फायनल मध्ये परळी तालुक्याला अटीतटीच्या सामन्यांमध्ये गुरुकुल इंग्लिश स्कूलच्या खेळाडूंनी अत्यंत उत्कृष्ट कामगिरी करत परळी तालुक्याच्या संघाचा पराभव करत दणदणीत विजय मिळवला. या स्पर्धा पार पाडण्यासाठी क्रीडा मार्गदर्शक , राठोड सर, जितू सर, उज्वल गायकवाड,





संजय धस, विस्तार आधिकारी अभिजीत तांदळे,अझहर शेख, सचिन गायकवाड सर, संतोष कवठेकर,शैलश जाधव ,गाल्फाडे , तनवीर पठाण , उपस्थितीमध्ये उद्घाटन झाले व स्पर्धा पार पडण्यास सहकार्य लाभले विजयी संघामधील खेळाडू कृष्णा गायकवाड, ने तीन ओव्हर च्या सामन्यामध्ये कृष्णा गायकवाड,आरशान पठाण यांनी अत्यंत उत्कृष्ट कामगिरी करत विजय मिळवण्या साठी मोलाचे योगदान दिले,तसेच सार्थक कोकरे,अन्वित सुभेदार, संग्राम तळेकर,मोहम्मद पान २ वर...

# धम्मदीक्षा जागृती अभियानाचे राहुरीत

## नियोजन: धम्मदीप युवा मंच,जयभीम मित्र मंडळाचा उपक्रम



राहुरी/पुण्यभूमी प्रतिनिधी

तथागत बुद्धिस्ट सोसायटी आणि बुद्धिस्ट सेमिनरीच्या विद्यमाने अहमदनगर येथून स्वाभिमान भूमी ते दीक्षाभूमी रॅली आयोजित करून धम्मदीक्षा जागृती खाली केली जाणार आहे. या जागृती रथात भदंत धम्मसार , बदलत सचित बोधी आणि भदंत धम्मपाल यांच्यासह समता सैनिक दलाचे पथक राहणार आहे. या धम्मरथ रॅलीचे राहुरीत धम्म दीप युवा मंच, जय भीम मित्र मंडळ यांच्यावतीने स्वागत आणि मंगल मैत्री फेरी काढण्यात येणार आहे.

या धम्म रथाचे बुद्धिस्ट सेमिनरीचे संचालक आणि मुख्य समन्वयक सत्येंद्र तेलतुंबडे, तथागत बुद्धिस्ट सोसायटीचे अध्यक्ष संजय कांबळे, समता सैनिक दलाचे प्रमुख दीपक पान २ वर...

# कागदेंना विधानसभेत पाठवण्यासाठी उपस्थित रहावे

## ॲड धम्मानंद वाघमारे:बीडमध्ये रिपाइंचा सत्कार सोहळा

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (–) बीड जिल्हा आयोजित मा. केंद्रीय मंत्री रामदासजी आठवले साहेब यांचा सत्कार समारंभ दी. ५ ऑक्टोबर रोजी होणार आहे तरी आंबेडकरी विचारांच्या युवकांनी एकत्र येत आपली एकजूट दाखवल्याशिवाय आपले प्रश्न सुटणार नाहीत. आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या समाजासमोर अनेक प्रश्न उभे आहेत. आपले प्रश्न सोडविण्यासाठी आपण आपली एकजूट दाखवणे महत्वाचे आहे. आपली एकजूट दाखवली तरच शासनालाही आपण आपल्या मागण्या पुर्ण करुन घेण्यास भाग पाडू शकतो. त्यामुळे आंबेडकरी युवकांनी कुठल्याही अमिषाला बळी न पडता स्वाभिमान बाळगून एकत्र या, असे आवाहन युवा रिपाई प्रदेशाध्यक्ष पप्पूजी कागदे यांनी युवकांना केले आहे



रिपाईची चळवळ अधिक गतिमान करण्यासाठी केंद्रीय मंत्री ना.रामदास आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली शेवटच्या श्वासापर्यंत कार्य करीत राहील अशी ग्वाही प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे साहेब यांनी दिली आहे

बीड जिल्हा रिपाईच्या वतीने ५ ऑक्टोबर रोजी केंद्रीय मंत्री ना. रामदास आठवले यांचा भव्य सत्कार सोहळा होणार असून स्वागत समारंभाच्या पार्श्वभूमीवर युवा नेते पप्पू कागदे हे बीड दौऱ्यातील प्रत्येक तालुक्यात आढावा बैठक घेत आहेत. तसेच महायुती मधील आपण एक महत्त्वाचे घटक पक्ष आहोत येणाऱ्या विधानसभेमध्ये कागदे साहेबांना आमदार झालेला बघण्याचे अनेक युवकांबरोबर धम्मानंद वाघमारे यांचे स्वप्न आहे त्या अनुषंगाने बीड जिल्ह्यातील तमाम आंबेडकरी समूहातील सर्व युवक जेष्ठ नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की आपण बीड जिल्हा रिपाईच्या वतीने ५ ऑक्टोबर रोजी भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन युवक रिपाई प्रदेशाध्यक्ष तथा रिपाईचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पूजी कागदे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात येणार आहे. हा सत्कार सोहळा न भुतो न भविष्यती असा करण्यासाठी पप्पूजी कागदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली उपस्थित राहण्याची आवाहन करत आहोत मा. पप्पू जी कागदे साहेब हे स्वतःमागील १५ दिवसांपासून बीड जिल्ह्यातील प्रत्येक गाव, तालुक्याच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन आढावा बैठक घेत आहेत. आबेडकरी चळवळ जिवंत ठेवायची असेल तर युवकांची पान २ वर...

# राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी निवड

## क्रीडा: जिया पठाण दिलावरचे यश



तलवाडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

शालेय क्रीडा विभागातर्फे दिं.४/९२०२४ रोजी घेण्यात आलेल्या विभागीय स्तरीय कबड्डी स्पर्धेत माध्यमिक विद्यालय तलवाडा या शाळेचा विद्यार्थी पठाण जिया दिलावर हा विद्यार्थी १७ वर्ष वयोगटामधून राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी त्याची निवड झालेली आहे... त्याच्या या निवडीबद्दल व यशाबद्दल संस्था अध्यक्ष मा. अमरसिंहजी पंडित, सचिव जयसिंह पंडित,जि.प. माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित, शारदा स्पोर्ट अकॅडमीचे रणवीर (काका )पंडित पृथ्वीराजे पंडित, पान २ वर...

# राखेच्या प्रदूषणापासून सुटका कधी

## ॲड. मनोज संकाये:पोलीस, महसूल प्रशासनाचे दुर्लक्ष

परळी/ पुण्यभूमी प्रतिनिधी

बारा ज्योतिर्लिंगापैकी पाचवे ज्योतिर्लिंग ज्योतिर्लिंगाचे ठिकाण असलेल्या परळी वैजनाथ हे सध्या राखेच्या प्रदूषणाच्या विळख्यात सापडले आहे त्यापासून सामान्य नागरिक जेरीस आला असून त्याची सुटका कधी होणार असा सवाल करत जाणून बुजून पोलीस आणि महसूल प्रशासन दुर्लक्ष करत आहे असा आरोप सामाजिक कार्यकर्ते अँड.मनोज संकाये यांनी केला आहे.

परळी वैजनाथ येथे थर्मल पावर स्टेशन आहे. कोळशाचा वापर करून औष्णिक वीज निर्मिती शहरात होते. शहरातील वीज निर्मिती होत असताना उरलेली राख ही विकल्या जाते. राखीचे मोठे मोठे टँकर्स वाहतूक




करत आहे मात्र वाहतूक करताना रस्त्यांवर राखेचे ढिगारे पडलेले आहेत. त्या ढिगार्यामधील राख हवेमध्ये मिसळून त्याचे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होत आहे.

शहरातील मुख्य रस्त्यावरून ही वाहने राखेची वाहतूक करतात शहरात सगळीकडे राखत राख दिसत आहे. ताडपत्रीने राख झाकली जात नाही ती सर्रास रस्त्यावर हवेमुळे उडते. वाहने राखेची वाहतूक उघडपणाने करत आहेत. नागरिकांच्या आरोग्याच्या समस्यामध्ये वाढ होत आहे. वाहनांना शिस्त लावणाऱ्या यंत्रणा मात्र जाणून बुजून दुर्लक्ष करत आहेत. सामान्य नागरिकांच्या आरोग्याच्या प्रश्नावर कोणी आवाज उठवायला तयार नाही ही मोठी शोकांतिका आहे.

# संविधान सन्मान रॅली उत्स्फूर्त

तलवाडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्रातील अनुसूचित जातीतील मातंग समाज व मातंग समाजातील तत्सम जातींना शैक्षणिक सामाजिक आर्थिक व राजकीय न्याय मिळावा यासाठी माननीय सर्वोच्च न्यायालयाने एक ऑगस्ट २०२४ रोजी अनुसूचित जाती जमातीतील अ ब क ड आरक्षण वर्गीकरणाचा निर्णय दिला होता त्या निर्णयाच्या सन्मानार्थ गेवराई तालुक्यातील सकल मातंग समाजाच्या वतीने आण्णा भाऊ साठे चौक, डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, शास्त्री चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, सांवता माळी चौक, मार्ग तहसील कार्यालय येथे संविधान सन्मान रॅली काढुन मा.सर्वाच्च न्यायालयाच्या आदेशाचा सन्मान व स्वागत करण्यासाठी गेवराई तहसील कार्यालयावर सकल मातंग समाजाच्या वतीने संविधान सन्मान रॅली काढण्यात आली या सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अनुसूचित जाती जमातीच्या आरक्षण वर्गीकरणाच्या आदेशाची अंमलबजावणी राज्य शासनाने तात्काळ करावी या साठी या रॅली मध्ये हजारो मातंग बंधु भगिनी सहभाग घेतला होता.

# ऊसतोड कामगार अपघात विमा योजना लागू

## निर्णय:धनंजय मुंडेंच्या पाठपुराव्यास मोठे यश

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्याचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री असताना धनंजय मुंडे यांनी स्व.गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाची स्थापना करून त्याअंतर्गत ऊसतोड कामगार व वाहतूकदार, मुकादम आदींसाठी संत भगवानबाबा ऊसतोड कामगार विमा योजना प्रस्तावित केली होती, त्या योजनेस आज संपन्न झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून राज्यातील सुमारे १० लाख ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार, मुकादम तसेच सुमारे दीड ते दोन लाख बैलजोड्या त्याचबरोबर कामगारांच्या झोपड्या यांना सुद्धा विम्याचे कवच आज झालेल्या निर्णयानुसार लागू करण्यात येत असून या योजनेचा संपूर्ण खर्च स्व.गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या भांडवलातून खर्च करण्यात येईल. ऊसतोड कामगार,



मुकादम, कारखाना यांपैकी कुणावरही या योजनेचा कसलाही आर्थिक भार राहणार नाही.

राज्याच्या बीडसह अहिल्यानगर, छत्रपती संभाजी नगर, परभणी, धाराशिव, लातूर, नांदेड, जालना, धुळे, जळगाव आदी जिल्ह्यातील सुमारे १० लाख ऊसतोड कामगार वेगवेगळ्या जिल्ह्यात तसेच शेजारील राज्यात कमीत कमी ६ महिने स्थलांतर करून उसतोडणीला जातात. ऊन, वारा, पाऊस, थंडी अशा कोणत्याही परिस्थितीत दिवसरात्र अत्यंत मेहनत व जोखमीचे काम त्यांना करावे लागते. ऊसतोडणी व वाहतुकीदरम्यान अनेक अपघात, विजेचा शॉक, सर्पदंश, वाऱ्या–पावसाने नुकसान, रस्ते अपघात यांसारख्या शेकडो समस्यांना तोंड देताना ऊसतोड कामगारांचे अनेकदा जीव जातात, अनेकजण कायमस्वरूपी अपंग होतात व त्यांच्या कुटुंबाचा आधार नाहीसा होतो. त्यामुळे या ऊसतोड कामगारांना, वाहतूक कामगारांना तसेच त्यांच्या पशूंना स्वतंत्र अपघात विमा योजना असावी, त्याद्वारे मृत्यू झाल्यास आर्थिक मदत, अपंगत्व आल्यास आर्थिक मदत व उपचार अशा निरनिराळ्या तरतुदी असाव्यात असे २०२२ मध्ये पान २ वर...

## संरक्षण द्यावे | अंबाजोगाई उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

# मुंदडा कार्यकर्ता पत्रकारांना धमकावू लागला!

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केजचे पत्रकार रोहन गलांडे यांना नंदकिशोर मुंदडा यांच्या सांगण्यावरून त्यांच्या कार्यकर्त्यांनी पत्रकार रोहन गलांडे यांना जिवे मारण्यांची धमकी दील्यामुळे अंबाजोगाई येथे उपजिल्हाधिकारी यांना निवेदन,पत्रकार रोहन गलांडे यांना संरक्षण द्यावे व जिवे मारण्याची धमकी देणाऱ्यावर दंडात्मक कार्यवाही करावी असे निवेदन मदनलाल परदेशी , ड घनशाम घोबाळे इच्छुक उमेदवार, गणेश गगने , गणेश औताडे,बीबीशन निकम , दिपक कांबळे रिपाइं व प्रमोद सर रिपाइं यांच्या वतीने देण्यात आले आहे.या विषय सविस्तर वृत्त असे की दैनिक पुण्यभुमी चे पत्रकार श्री. रोहन गलांडे यांना लोकशाहीच्या भारत देशात हुकुमशाही प्रमाणे धमक्या देणाऱ्या लोकांना जेरबंद करण्यात यावे, हल्लीच्या



काळात प्रखर व रोकठोक सत्यता जनतेसमोर मांडणारे पत्रकाराला अशी धमकी देत असेल तर भारत देश पारतंत्र्यात आहे का असे वाटते. पुर्वी पारतंत्र्यात भारतीयांचे बाजु मांडणारे दैनिक केसरीचे थोर समाजसुधारक लोकमान्य टिळक यांनी स्वतंत्र लढ्याचा प्रवक्ता व वाणी म्हणून केसरी वर्तमानपत्र पुणे येथे सुरु केले होते, मराठी भाषेतील दर्पण हे वर्तमानपत्र थोर समाजसुधारक बाळशास्त्री जांभेकर पत्रकार होते. थोर समाज सुधारक गोपाळ गणेश अगरकर, थोर समाजसुधारक प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे, हे मराठी पत्रकार होते. पारतंत्र्यात यांना असंतोषाचे जनक म्हणून ओळखले जायचे यांची प्रेरणा व आदर्श घेवून रोहन गलांडे रोकठोक बातम्या देतो. पुण्यामुमी या वर्तमानपत्रातुन पत्रकारीतेला लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हणून अख्खा भारत देश पाहतो पण केज मतदार संघातील सत्ताधारी पक्षाचे कार्यकर्ते गलांडे यांची मुसकटदाबी, गळचेपी करुन जिवे मारण्याच्या धमकी देत असतील पान २ वर...

# भेटीत नेमकी काय चर्चा झाली!

## पडघम: मनोज जरांगेंची अंजली घाडगेंनी घेतली भेट

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

क ज मतदारसंघाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी व वर्षानुवर्षे विकासापासून कोसो दूर असलेल्या या मतदारसंघाचा चौफेर विकास करण्याची दृष्टी ज्यांच्याकडे आहे. त्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या डॉ. अंजलीताई घाडगे यांना अंबाजोगाई शहर आणि तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. २ ऑक्टोबर डॉ. अंजलीताई रोजी यांनी अंबाजोगाई शहरातील अनेकांना भेटून थेट संवाद साधला. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या लोकप्रिय ठरत असलेल्या नेत्या डॉ. अंजलीताई घाडगे या मागील अनेक वर्षांपासून समाजकारणात व राजकारणात कार्यरत आहेत. त्यांचा मोठा जनसंपर्क आहे.



नवी आव्हाने पेलून त्या आता विधानसभेच्या निवडणुकीत विजयी झेप घेण्यासाठी सज्ज झाल्या आहेत. त्यांनी निवडणूक लढविण्याची पूर्णतः तयारी केली आहे. केज हा मतदारसंघ मागील ३० वर्षांपासून राखीव आहे. तो ज्यांच्या ताब्यात आहे. त्यांनी अंबाजोगाई जिल्हा करतो, बुट्टेनाथ साठवण तलाव निर्माण करण्याचे, काळवटी साठवण तलावाची उंची वाढविणार, एमआयडीसी उभारणार यासारख्या विविध भूलथापा देवून प्रत्येकवेळी जनतेला भावनिक केले परंतु जनता जनार्दन नक्कीच जागा दाखवून देणार आहे.